# कादंबरी.

वि. का. राजवाडे.

॥ श्री ॥

# कादंबरी.

( या विषयाचे तात्विक विवेचन करणारा निबंध. )

लेखकः —

इतिहासाचार्य

वि० का० राजवाडे

प्रकाशक व मुद्रकः—विनायक शंकर वैद्य वाङ्मय विशारद.

आनंद प्रेस सातारा.

विजयादशमी शके १८५०

किंमत चार आणे.

# प्रास्ताविक दोन शद्ब.

सत्यान्वेषण हे संशोधनाचें ध्येय आहे. इतिहास, समाज, भाषा इत्यादि पुरातत्वाचीं जीं प्रधान अंगें आहेत त्यांच्या संबंधीं सत्यान्वेषण करण्याच्या इच्छेनें जें संशोधन कार्य के राजवाडे यांनीं केलें तें कमी अधिक प्रमाणानें सर्वांच्या परिचयाचे आहे. त्याच सत्यान्वेषणाबाबत झालेल्या संशोधनाच्या आणखी एका अंगाचें आविष्करण प्रस्तुतच्या " कादंबरी " ह्या निबंधाच्या प्रकाशनानें होत आहे. राजवाडे ह्यांच्या लिखाणामध्यें त्या त्या विषयाच्या योग्य परिष्कार येऊन पुन्हां त्या त्या विषयावरील तात्विक स्वरूपाचें चिरस्थायी असें विवेचन येत असतें. त्या त्या विषयाचें तें एक प्रकारचें तत्वज्ञानच असें. त्याप्रमाणें प्रस्तुत निबंधांत कादंबरीचें तात्विक स्वरूप " Philosophy of fiction दाखविलें आहे. व हें तात्विक स्वरूप दाखवितांना अद्भुत कादंबरींची परंपरा, त्यांचा जुना इतिहास, इंग्लंड, फ्रान्स, रशिया ह्या देशांतील उत्कृष्ट वास्तविक व अद्‌भूत कादंबरीकार कोणते व त्या मापानें तोलावयाचें झाल्यास मराठी कादंबरीकारांची योग्यता काय ठरते व त्यांच्यापासून कोणती अपेक्षा करावयाची इत्यादि प्रश्नांचा विचार त्यांनीं केला आहे. " सहानुभूतिप्रमाणें सत्याकडे व प्रोत्साहनाप्रमाणेंच प्रगतिकडे विशेष लक्ष पुरविण्याचा राजवाड्यांचा नेहमींचा हेतु असल्यामुळें त्यांनीं मराठी कादबऱ्याची जगांत असणाऱ्या उत्कृष्ट सवर्गीयसारस्वताशीं तुलना केली व मराठी कादंबऱ्यांच्या बाबतींत इतर राष्ट्रांच्या मानानें आपण किती मागें आहोंत, आपली किती निराशेची स्थिती आहे ह्याची जाणी करून दिली. समाधान इतकेंच कीं आपण त्या प्रगतीच्या मार्गावर मात्र आहोंत व पाऊल पुढें पडत आहे. व योग्य मार्गानें जर ह्या सारस्वताची जोपासना आपण केली तर टॉलस्टॉय, ह्युगो, झोला, स्कॉट, फील्डींग, डिकन्स ह्यांच्या तोडीचे कादंबरीकार महाराष्ट्रांत खास उत्पन्न होतील.

कादंबरीकाराला श्रेष्ट विद्या, विस्तृत वाचन, मोठा प्रवास तीक्ष्ण निरीक्षण, कडक परीक्षण, थोर औदार्य, गाढ सहानुभूति, नाटका

लेखणी इत्यादि गुण लागतात. ह्या शिवाय जाज्वल्य मनोवृत्ति हा गुण प्राप्त करून घेणें हाच उत्कृष्ट सारस्वत निर्मितीचा मुख्य उपाय आहे. ही जाज्वल्य मनोवृत्ति म्हणजे तरी काय? " विधवांचीं दुःखें पाहुन जीव तिळतिळ तुटला पाहिजे, गरीबांचीं उपासमार पाहून स्वतांच्या घशा-खालीं घास उतरतां कामा नये, स्वदेशाचें दैन्य पाहून रात्रींची झोंप डोळ्यादरून उडून जावी व स्त्रियांची बेअब्रु झालेली पाहून द्रौपदीच्या भीमाप्रमाणें त्वेष यावा " असली मनोवृति म्हणजे जाज्वल्य मनोवृत्ति होय. ही इतकी उत्कृष्टत्वानें जाज्वल्य झाल्यावर ती जोरदार वाङमय निर्माण केल्याशिवाय रहाणार नाहीं.

सहृदय वाचकांमध्यें जिव्हाळा व आपुलिक उत्पन्न करणारी अशाप्रकारची वृत्ती म्हणजे एक प्रकारची सहानुभूतीच होय. सहृदय वाचकांना कादंबरींतील सृष्टीचा साक्षात् अनुभव करून देण्यास समाज व ह्यांच्यांत नानाप्रकारच्या मिश्रणानें वावरत असलेल्या अद्भुत व वास्तविक या दोन तत्वांचा आश्रय करावा लागतो. कादंबरीचे जे लघुकथा, अद्भुतकथा, व वस्तुस्थित्यादर्शक कथानकें व त्यांचेहि पुन्हां व्यक्तिविषयक व सामाजविषयक वगैरे जे प्रकार आहेत त्या सर्वांची उभारणी ह्या तत्वांच्या कमी अधिक संमीलनावर झालेली आहे. सृष्टीच्या कार्याचा पसारा जरी कार्य कारणाच्या शृंखलेनें जरि बद्ध असला तरी त्यांतील एकदांच दुवा माहित असतो. बाकीच्यांचें गांढ अज्ञान असते. ह्या अज्ञानाचा उलगडा कादंबरीकार अद्भुताच्या साहाय्यानें करीत असतो. अशाप्रकारचा उलगडा रामायण भारतादि पुराणांनीं, शनिमहात्म्य, सत्यनारायण, गुरुचरित्र ह्या सारख्या कथानकांनीं इसाबनीति, वेताळपंचविशी सारख्या अद्भुत कहाण्यांनीं केलेल्या कादंबरीचा इतिहास सांगतो. अद्भुतांची अतिशयोक्ति मराठी कादंबऱ्यांच्या प्रथमप्रथमच्या स्थितींत म्हणजे १८४०– १८६० पर्यंत झालेली दिसते. अद्भुतामध्यें वास्तविकाचें मिश्रण करून कादंबरीला ध्येयविशिष्ट असें वळण १८६० नंतरच्या कादंबरींना प्राप्त झालेलें दिसतें. १८७० नंतरचा काळ हा वास्तविक कादंबऱ्यांचा काळ होय. ह्या काळामध्यें ह० ना० आपटे हे अग्रेसर कादंबरीकार होत. रा० आपटे यांनीं ' तत्वाचा निराळाच अर्थ केल्यामुळें, समाजांतील गलिच्छ भागाचे यथायोग्य प्रदर्शन त्यां-

च्याकडून न झाल्यामुळें व विशेषतः त्यांचा ओढा सामाजिक प्रश्नाकडे-च असल्यामुळें आपल्यांच्या कादंबरींत एक वैगुण्य आलें, फ्रेंच अथवा रशियन कादंबरीकारांनीं तरुणपिढींतील लोकांच्या मताची रचना करण्याचें जें कार्य केलें व जो राष्ट्रीय विचाराचा व आचाराचा धडा देण्याचें जें श्रेय संपादिलें ते आपल्यांच्या वाट्यास येऊं शकत नाहीं.

असला राष्ट्रीय बाण्याचा धडा कादंबरीकारांनासुद्धां देतां येण्यासारखा आहे. तो त्यांनीं द्यावा व राष्ट्रोद्धाराच्या कार्याला हातभार लावावा हा हेतु मनांत धरून राजवाडे ह्यांनीं हा कादंबरीचें तत्वउलघडण्याचा प्रयत्न केला. तो त्यांचा हेतु डयुमाससारख्या दोन हजार कादंबऱ्या लिहिणारा किंवा बाल्झाकसारखा ‘ मानवी नाटक लिहिणारा जरी कादंबरीकार महाराष्ट्रांत झाला नाहीं तरी थोड्या ’ प्रमाणावर कां होईना फलद्रूप होवो अशी सदिच्छा प्रगट करतों. हा निबंध पूर्वी ग्रंथमालेंत १९०२ साली प्रसिद्ध झाला होता. तोच पुन्हां पुनर्मुद्रित स्वरूपांत आनंद प्रेसचे उत्साही मालक वि० शं० वैद्य वाचकांच्या स्वाधीन करीत आहेत. त्यांच्या प्रयत्नाला योग्य आश्रय देऊन सहृदय वाचक सत्कार करतील अशी आशा प्रदर्शित करून हा प्रास्ताविक लेख पुरा करतो.

विजया दशमी
शके १८५०
सातारा.

कृ० पां० कुलकर्णी.

— —

# कादंबरी.

१. गेल्या पैशीं वर्षांत महाराष्ट्रांत जे गद्य ग्रंथ झाले, त्यांत संख्येच्या मानानें कादंबऱ्यांना अग्रस्थान देणें जरूर आहे. युनायटेड् स्टेट्स्, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया, इटली वगैरे पश्चिमेकडील एकेका देशांत दर वर्षाच्या बारा महिन्यांत नाना प्रकारच्या कादंबऱ्यांचा जितका उद्भव होतो, तितक्याच्या निम्पट देखील आपल्या ह्या देशांत गेल्या सबंद पैशीं वर्षांत झाला नाहीं. अशी जरी आपल्या इकडील स्थिति आहे, तत्रापि गेल्या पैशीं वर्षांतील महाराष्ट्रांतील एकंदर सारस्वताचा बराच मोठा भाग कादंबरीमय असल्यामुळें, हा भाग केवळ दुर्लक्ष करण्यासारखा नाहीं हें उघड सिद्ध होतें. हें कादंबरीमय सारस्वत (१) लहान गोष्टी, (२) अद्भुत कथा व (३) वस्तुस्थित्यादर्शक कथानकें ह्या तीन घटकांनीं बनलेलें आहे. पश्चिमेकडेही ह्या असल्या सारस्वताचे हे असेच तीन घटक असतात व ह्या तीन घटकांच्या उद्भवाची ऐतिहासिक परंपराही तिकडल्याप्रमाणेंच आपल्या इकडेही तशीच असलेली दृष्टीस पडते. म्हणजे इसाबनीती, बाळमित्र, पंचोपाख्यान, वेताळपंचविशी वगैरे लहान लहान गोष्टींचा प्रथम उदय झाला; नंतर मुक्तामाला, मंजुघोषा, विचित्रपुरी वगैरे अद्भुत कथा जन्मास आल्या; आणि शेवटीं अलीकडेस, आजकालच्या गोष्टी, पण लक्षांत कोण घेतो?, जग हें असें आहे, नारायणराव आणि गोदावरी, शिरस्तेदार, वेणू, बाईकर भटजी वगैरे वस्तुस्थित्यादर्शक किंवा वास्तविक कथानकें लिहिलीं गेलीं. आपल्या इकडील कादंबरीची ही अशी तीन पायऱ्यांची परंपरा आहे.

२. ह्या परंपरेंतील पहिल्या पाहिरीवरील लहान गोष्टींत पुढील दोन पायऱ्यांचीं मुळें दृष्टीस पडतात. अद्भुत कादंबऱ्यांची जी दुसरी पाहिरी सांगितली तिचे पूर्वज इसाब्नीती, पंचोपाख्यान वगैरे लहान लहान अद्भुत कथा होत. तसेंच आज कालच्या गोष्टी वगैरे वास्तविक कथानकांचा जो वर उल्लेख केला आहे त्यांचा स्नेहसंबंध बाळमित्राशीं असलेला दृष्टोत्पत्तीस

घेतो. पुढील दोन पाद्यऱ्यांशीं मागील दोन पाद्यऱ्यांचा हा जो संबंध दाखविलेला आहे, त्यावरून एवढें स्पष्ट होतें कीं पहिल्या प्रथम ज्या लहान गोष्टी प्रसिद्ध झाल्या त्यांतच अद्भुत व वास्तविक असे दोन प्रकार होते. त्याच दोन प्रकारांचा पुढें परिपोष होऊन, एका प्रकारापासून अद्भुत कादंबऱ्यांचा व दुसऱ्या प्रकारापासून वास्तविक कथानकांचा प्रादुर्भाव झाला. जीवसृष्टींतील कनिष्ठ प्राण्यांत द्वैधीभावानें संतानवृद्धी होतांना आपण पहातों तोंच प्रकार ग्रंथसृष्टींत सर्वत्र होतो व आपल्या इकडे हा प्रत्यक्ष झालेला आपण पहात आहों. अद्भुत कादंबऱ्यांची व वास्तविक कथानकांची ही वंशावळ पाहिली म्हणजे असाही पूर्वग्रह मनांत उत्पन्न होतो कीं, पूर्वजांचे गुणदोष प्रजेच्या ठायीं जीवसृष्टींत जसे दृष्टीस पडतात, तसेंच ग्रंथसृष्टींतही पडले पाहिजेत. वरील तीन पाद्यऱ्यांतील पूर्वग्रंथांचीं व उत्तर ग्रंथांचीं लक्षणें ताडून पाहिलीं म्हणजे हा पूर्वग्रह सिद्धान्तवत् होण्याच्या लायखीचा आहे असें वाटूं लागतें. बाळमित्र हा छोटेखानी गोष्टींचा ग्रंथ फ्रेंचमधून इंग्रजींत उतरलेल्या एका नामांकित ग्रंथाचा उत्कृष्ट मराठी तर्जुमा आहे. त्याप्रमाणेंच, जग हें असें आहे, वाईकर भटजी, पुरी: हौस, फिटली, रायवाड्यांतील कट, मथुरा, नाहींचना ऐकायचें, शिलादित्य, करण वाघेला, वगैरे वास्तविक कथानकें हीं कित्येक इंग्रजी व फ्रेंच सामान्य किंवा चांगल्या ग्रंथांचीं रूपांतरें आहेत. इसाब्नीति, पंचोपाख्यान, वेताळपंचविशी, वगैरे छोटेखानी अद्भुत गोष्टी ग्रीक व संस्कृत ग्रंथांचीं दूरचीं रूपान्तरें आहेत. त्याप्रमाणेंच, अरबी भाषेंतील सुरस गोष्टी, अजब ऐनेमहाल, रासेलस, हातिमताई, वगैरे अद्भुत कादंबऱ्याही कित्येक परदेशी नामांकित ग्रंथांचीं उत्कृष्ट भाषान्तरें आहेत. सारांश, अलीकडील बऱ्याच अद्भुत कादंबऱ्या व वास्तविक कथानकें पूर्वींच्या अद्भुत व वास्तविक गोष्टींप्रमाणेंच परभाषेंतील ग्रंथांचीं रूपान्तरें, भाषान्तरें किंवा सूचनान्तरें आहेत.

३. हे ग्रंथ रूपान्तर, भाषान्तर किंवा सूचनान्तर आहेत म्हणून त्यांच्यांत कांहीं अर्थ नाहीं असें मात्र कोणी समजूं नये. कारण परभाषेंतून उतरलेल्या ह्या ग्रंथापैकीं कांहीं इतके उत्कृष्ट उतरलेले आहेत कीं, ते ग्रंथ आज दोन तीन पिढ्या आबालवृद्धांच्या करमणुकीचे विषय झालेले आहेत व मराठी भाषेंतील कादंबरी ग्रंथांत त्यांची उत्तमोत्तमांत गणना होत आहे. यद्यपि ह्या ग्रंथाची अशी योग्यता आहे तत्रापि त्यांच्यांत एक मोठी थोरली

गोम आहे. ती गोम ही कीं, ही ग्रंथोत्पत्ति आमच्या अस्सल प्रतिमेची अस्सल प्रजा नव्हे. जो अखंड भेद अस्सल व नक्कल, औरस व दत्तक, स्वकीय व परकीय, घरचें व बाहेरचें, मालकीचें व उसनें ह्यांच्यांत आहे, तोच अभेद्य द्वैधीभाव ह्या परभाषेंतील वर्तमान भाषांतरांत व स्वभाषेंतील स्वतःच्या प्रतिमेनें निर्मिलेल्या स्वतंत्र ग्रंथोत्पत्तींत आहे. आमचा आत्मा, आमचा स्वभाव, आमचा उत्साह, आमची महत्वाकांक्षा, आमचा पुरुषार्थ ह्या नकलेंत, ह्या पाहुण्यांत, ह्या दत्तकांत बिलकुल दिसावयाचा नाहीं. दुसऱ्याचें सुंदर पोर पाहून जें कौतुक वाटणें शक्य आहे, त्याच्याहून लाखो पटीनें अनिवार असा उमाळा स्वतःच्या गोजिरवाण्या मुलाचें तोंड पाहून सहजच येतो, ही तर प्रत्यक्षाची गोष्ट आहे. आणि हीच कथा ह्या उसन्या ग्रंथाची आहे. ह्या ग्रंथापासून मनाची करमणूक होत नाहीं. कांहींशी होते. अरबी गोष्टींतील सिंदबादचीं संकटें किंवा रासेलसांतील वक्त्वेरयाचीं भाषणें ऐकून चित्ताचें रंजन होतें. परंतु भोजाचीं किंवा विक्रमादित्याचीं संकटें व चन्द्रापीडाचीं किंवा हरिश्चंद्राचीं भाषणें ऐकून जी मनाची स्थिति होते, तिच्या पासंगालाही वरचें रंजन लागणार नाहीं. एखाद्या भावी मराठी ग्रंथकारानें, सिंदबाद, जिल्ब्लास, डॉन किझोट, गार्गांचुआ, वगैरे-सारखीं अद्भुत पात्रें आपल्या कल्पनासृष्टींतून निर्माण केलीं व तीं महाराष्ट्रांतील अद्भुत सृष्टींतीलच आहेत अशी सहृदय वाचकांची खात्री झाली, तर जो पिढ्यानपिढ्या करमणुकीचा, सदुपदेशाचा, व अंतःस्वभावाच्या समाधानाचा साठा प्राप्त होणार आहे, तो ह्या आगंतुक ग्रंथांतील परदेशी पात्रांच्या उपलब्धीनें कधींतरी होईल काय ? स्वतःच्या कमाईच्या फळांत जी गोडी आहे ती परक्यापासून घेतलेल्या उसन्यांत कशी यावी !

४ असो. मराठींत झालेले बरेच कादंबरीग्रंथ हे असल्या योग्यतेचे आहेत. परंतु स्वतंत्र असेही कांहीं कादंबरीग्रंथ मराठींत अगदींच नाहींत असें नाहीं. ह्या स्वतंत्र ग्रंथांपैकीं कांहीं अद्भुत आहेत व कांहीं वास्तविक आहेत. अद्भुतांपैकीं प्रसिद्ध असे म्हटले म्हणजे, मुक्तामला, रत्नप्रभा, मंजुघोषा, विचित्रपुरी वगैरे; व वास्तविकांपैकीं, आजकालच्या गोष्टी, पण लक्षांत कोण घेतो, वेणू, नारायणराव व गोदावरी, वगैरे वगैरे. पैकीं अद्भुताचा प्रथम विचार करतों.

५. सृष्टीचा सर्व बाजूंनीं परिचय करून घेण्याचा प्रयत्न सामान्यतः

सर्व जीवमात्राचा व विशेषतः मनुष्यमात्राचा आज लाखो वर्षे चाललेला आहे. ह्या प्रयत्नांत त्याला दिवसेंदिवस असें कळून येत चाललें आहे कीं कार्यकारणांच्या शृंखलेनें सर्व सृष्टि बद्ध झालेली असावी. परंतु ह्या शृंखलेचा एखाद दुसराच तेवढा दुवा आपल्याला कळलेला आहे, व बाकीच्या सर्व दुव्यांसंबंधीं आपलें बहुतेक अज्ञानच आहे, अशीही मनुष्याची खात्री झालेली दिसते. ज्या दुव्यांसंबंधीं अज्ञान आहे त्यांच्याशीं मनुष्याला वस्तुसृष्टींत ढवळाढवळ करतां येत नाहीं ही तर सिद्धान्तवत् गोष्ट आहे. आतां जेथें सृष्टीचा कांहीं भाग कार्यकारणाच्या शृंखलेनें बद्ध आहे व कारणांची उपस्थिति केली असतां कार्याची उपस्थिति नियमानें होईल अशी मनुष्याची खात्री असते तेथें देखील कारणांची जुळवाजुळव करण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें कार्याची उपलब्धि हवी तेव्हां होत नाहीं, असा मनुष्यमात्राचा रोजचा अनुभव आहे. सारांश ह्या अनंत सृष्टींत ज्यांच्यावरती मनुष्याचा काडीचाही ताबा नाहीं, ज्यांच्याशीं त्याला यत्किंचितही ढवळाढवळ करतां येत नाहीं, अशाच बहुतेक सर्व मूर्तामूर्त वस्तू आहेत. ही मनुष्याच्या दुर्बलतेची जी खात्री तीच अद्भुताच्या मुळाशीं आहे. साक्षात् सृष्टींत, वास्तविक सृष्टींत आपलें कांहीं एक चालत नाहीं अशी मनाची बालंबाल खात्री झाली ह्मणजे मग मनुष्यप्राणी कल्पनेच्या सृष्टींत, अद्भुताच्या सृष्टींत आपला ताबा मनमुराद चालवूं लागतो. वास्तविक सृष्टींतला हा गुलाम कल्पनासृष्टींत केवळ अरेरावी माजवितो. वास्तविक सृष्टींत जे निवळ असंभवनीय तें तो अद्भुतसृष्टींत शक्य करून सोडतो. अद्भुत सृष्टींतील ही जी अजब दुनिया तीच अद्भुत कादंबऱ्यांचा विषय होय. हवेंत चालणारीं माणसें, सर्वसौंदर्यसंपन्न स्त्रिया, अखिलगुणगुणालंकृत राजपुत्र, कोठेंही न सांपडणारें रामराज्य, अशा नानाप्रकारच्या वस्तू ह्या अद्भुत सृष्टींत सांपडतात. ज्या ज्या वस्तूंत ह्मणून ह्या वास्तविक सृष्टींत व्यंग असें सांपडतें, ती ती वस्तू अद्भुत सृष्टींत सांग अशी हटकून आढळते. समुच्चयानें विधान करावयाचें ह्मटलें ह्मणजे, वास्तविक सृष्टींतील अपूर्णता अद्भुत सृष्टींत पूर्णतेप्रत पोहोंचलेली आढळते.

६. ह्या अद्भुत सृष्टीचीं उदाहरणें पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांच्या संस्थांत विचारांत व सारस्वतांत मुबलक आहेत. धर्म, नीति, वेदान्त, इतिहास, गणित, नाटक, कादंबरी, चित्रकला, मूर्तिकला, स्थापत्य, कायदा, कविता वगैरे

-सर्व स्थलीं अद्भुताचा प्रादुर्भाव झालेला दिसतो. धर्मांतील ईश्वराची कल्पना, नीतींतील आत्यंतिक सुखाची कल्पना, वेदान्तांतील सच्चिदानन्दाची कल्पना, इतिहासांतील सुराज्याची कल्पना, गणितांतील शून्याची कल्पना, नाटकांतील अघटित घटना, चित्रकलेंतील सौंदर्यातिशयाची कल्पना, कायद्यांतील हक्काची कल्पना, ह्या सर्व कल्पना वास्तविक सृष्टींतील नसून निव्वळ अद्भुत सृष्टीपैकीं आहेत. आणि असें असून म्हणजे वास्तविक सृष्टींतील नसून त्यांच्याइतका वास्तविकपणा दुसरा कोठेंच नाहीं. सर्व संस्थांच्या, विचारांच्या व शास्त्रांच्या मूळाशीं ह्या कल्पनाच आहेत. असा हा ह्या अद्भुत कल्पनांचा महिमा आहे ! व म्हणूनच जगांतील अत्यंत जुने सारस्वत जे वेदग्रंथ त्यांच्यापासून तों तहत प्रस्तुतच्या यूरोपांतील अत्यंत भिकार अशा वास्तविक कादंबरीपर्यंत ह्या कल्पनांचा स्पर्श कमजास्त प्रमाणानें असलेला आढळतो कमींत कमी असा अद्भुताचा स्पर्श पहावयाचा असल्यास तो गणितादिशास्त्रांत अत्यंत कमी प्रमाणावर सांपडतो. शून्य, बिंदू, अणू वगैरे एकेक अद्भुत कल्पना ह्या गणितादि शास्त्रांचा मूलाधार आहे. ह्या मूल अद्भुत कल्पनांपलीकडे ह्या शास्त्रांत अद्भुत असें दुसरें कांहीं एक नाहीं; सर्व वास्तविक असाच प्रकार आहे. हाच न्याय व्याकरणादि शास्त्रांनाही लागू पडतो. शंकराच्या डमरूंतून अथवा मनुष्याच्या उच्चाराच्या नाळ्यांतून जो ॐकार निघाला तोच सर्व शब्दजाताचा अद्भुत मूलस्तंभ होय. सारांश सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, जें जें म्हणून कांहीं शास्त्र ह्या सञ्ज्ञेला पात्र म्हणून आपण समजतों, तें तें सर्व एकेका अद्भुत कल्पनेच्या पायावर रचलेलें आहे, आणि जें जें म्हणून कांहीं शास्त्रांच्या प्रांताच्या बाहेर असलेलें दिसतें त्यांत अद्भुताची कमजास्त रेलचेल आहे.

७. हा शास्त्रबाह्य प्रदेश म्हटला म्हणजे अद्भुताच्या अत्यंत उत्कट विहाराचें स्थल होय. काव्य, नाटक, कादंबरी, चित्रकला, मूर्तिकला, स्थापत्य, नृत्य, गान वगैरे ललितकला ह्या आपल्या अद्भुत देवींचीं माहेरघरें होत. ह्या ललितकृतींचा एकेक अद्भुत कल्पना घेऊन निर्वाह लागत नाहीं. त्यांना प्रत्येक संकटसमयीं निरनिराळ्या अद्भुत कल्पनांचें साहाय्य घ्यावें लागतें. मेघांना सजीवत्व दिल्याशिवाय कालिदासाचें भागत नाहीं. कांहीं तरी दैवी मध्यस्थीची गरज नाटकांतील आषुक माषुकांची भेट व्हावयाला लागते. अशा नाना प्रकारच्या अद्भुत युक्त्या व कल्पना ह्या ललितकलांत पदोपदीं

योजाव्या लागतात. त्या बेतानें व तारतम्यानें जर योजिल्या तर सहृद-यांच्या आनंदाला कारण होतात व त्यांचा बाजवीपेक्षां फाजील अतिरेक झाला, तर त्या सहृदयांच्या मनाला वीट आणितात. ह्या ललित-कलांतील अद्भुत कल्पनांत व शास्त्रांच्या मुळाशीं असलेल्या अद्भुत कल्पनांत एक मोठा भेद आहे. तो हा कीं शास्त्रांच्या मुळांशीं असलेल्या एकेका अद्भुत कल्पनेचा परिष्कार तर्कशास्त्राच्या सिद्धान्तांना धरून होत असतो व ललितकलांतील अद्भुत कल्पनांची झुंड तर्कशास्त्रांतील सिद्धांताना धक्के मारून आपलें साम्राज्य सुरू करते. शास्त्रांत कार्यकारणभावाचा सर्वत्र विजय असतो व ललितकलांत ह्या भावाला फारसा थारा मिळत नाहीं. शास्त्राचा संकुचित प्रदेश व अद्भुताचें विस्तृत विश्व ह्यांत खरोखरच अक्षरशः जमीनअस्मानाचें अंतर आहे.

८. ह्या अद्भुताची व्याप्ति किती जगड्व्याळ आहे त्याचें स्थलनिरूपण येथपर्यंत झालें. परंतु त्याची यथार्थ कल्पना होण्यास कांहींसें खोल जाऊन त्याचें ऐतिहासिक परंपरित स्वरूप दाखवून देणें जरूर आहे. ही परंपरा एकदां ध्यानांत आली म्हणजे अद्भुत कादंबरीचा इतिहास किती जुना आहे व मनुष्यमात्राच्या प्रगतीचें तिनें केवढें मोठें कार्य साधिलें आहे तें स्पष्ट होईल.

९. अगदीं जुन्यांत जुनी अशी पश्चिम पृथ्वीवरील अक्षरानें लिहिलेली अद्भुत कादंबरी म्हटली म्हणजे यहुदी लोकांचा जुना करार होय. शास्त्रसिद्ध जो कार्यकारणभाव त्याचा पूर्ण अभिभव करून लिहिलेलें असें जर कांहीं सारस्वत कोठें असेल तर तें जुन्या करारांतील अद्भुत गोष्टींत उत्कट भर-लेलें आहे. जुन्या करारांतील रुथच्या अद्भुत कादंबरीच्या जोडीचें सारस्वत ह्या पृथ्वीतलावर एकट्या भारतवर्षांतच तेवढें सांपडेल. भारतांतील शिबी राजाची कथा, किंवा हरिश्चंद्राची कथा, किंवा दमयंतीची कथा, किंवा सावित्रीची कथा ह्या सर्व गोष्टी अद्भुत कादंबरीचे अनुपम मासले आहेत. नव्या करारांतील ख्रिस्ताची कादंबरी तर अत्यंत अद्भुत आहे. त्याच्या जोडीला आपल्या इकडील दधीचि ऋषीची कादंबरी ठेवतां येण्या-सारखी आहे. बायबल सोडून देऊन पुढें प्रयाण केलें असतां मध्ययुगांतील ख्रिस्ती संतांचीं चरित्रें ही अद्भुत कादंबऱ्यांचीं उत्कृष्ट उदाहरणें आहेत. आपल्या इकडील साधुसंतांचीं अद्भुत कृत्यें ज्यांत वर्णिलीं आहेत तीं संत-

चरित्रें त्यांची बरोबरी उत्तमोत्तम करतात. ग्रीस देशांत प्लातों ऊर्फ अलफ्लातून नांवाचा प्रख्यात तत्ववेत्ता व प्रबंधकार झाला. त्याचे तर सर्व ग्रंथ येथून तेथून अद्भुत कथांनीं ओथंबलेले आहेत. स्वर्ग, पाताळ, यक्ष, किन्नर सुराज्य, कुराज्य वगैरेविषयीं त्यानें जीं अद्भुत वर्णनें दिलीं आहेत, तीं वाचून यूरोपांतील प्रोफेसर अत्यंत मोहून गेलेले आहेत; परंतु ह्या विद्वद्रत्नांनीं जर अग्नि, वायु वाराह वगैरे आमच्या इकडील पुराणांचा अभ्यास केला तर अद्भुत सृष्टीच्या निर्माणकलेंत आर्यावर्तांतील पौराणिक अलफ्लातूनला हजारों अद्भुत गोष्टी शिकवूं शकले असते हें त्यांना निरभिमानानें कबूल करावें लागेल. परेतांचे आत्मे कोणच्या कुत्र्याला हटकून कोणत्या होडींतून कोणत्या प्रदेशांत जाऊन कोणतीं दुःखें किंवा सुखें किंवा किती वर्षें भोगतात ह्याचा जो तपशील प्लातोनें दिला आहे तो सर्व एकत्र संकलित केला आणि आपल्या इकडील गरुडपुराणांत दिलेल्या परेतांच्या पारलौकिक चरित्राशीं त्याची तुलना केली, तर गरुडपुराण रचणाऱ्या व्यासापुढें अलफ्लातूनला दुधखुळ्या पोराचीच उपमा द्यावी लागेल. केवळ तपशिलाच्या विस्तारापुरतीच ही उपमा साजेल असें नाहीं; तर राजनीति, व्यवहारनीति, वेदान्त, शब्दशास्त्र, संगीत वगैरे नानाशास्त्रांच्या प्रमेयासंबंधानेंदेखील ह्या पुरातन यवनाला फारशी फुशारकी मारण्याला जागा राहील असें वाटत नाहीं. आपल्या देशांतील धर्मातल्या ज्या पुराणकथा व कहाण्या होत्या; त्या प्लातोनें आपल्या प्रबंधांत गोंविल्या आहेत; व तोच प्रकार भरतखंडांतील पुराणांतून झालेला आहे.

१०. यूरोपांतील धर्मग्रंथांतील, संतचरित्रांतील किंवा तत्वप्रबंधांतील अद्भुत गोष्टींत व आपल्या इकडील इतिहास व पुराणें ह्यांतील अद्भुत गोष्टींत बरेंच साम्य आहे हें वरील तुलनेवरून स्पष्टच होतें. परंतु ह्या अद्भुत गोष्टींत दुसरें एक अत्यंत महत्वाचें साम्य आहे. वास्तविक कादंबरीकारांची अशी एक अभिमानयुक्त दर्पोक्ति ऐकण्यांत येते कीं वास्तविक कादंबऱ्यांचा जो समाजावरती परिणाम घडतो त्याच्या सहस्रांशही अद्भुत कादंबऱ्यांचा घडत नाहीं. परंतु वास्तविकांचें हें विधान अनुभवाला क्वचितच धरून आहे. पालस्ताईनांतील जुन्या करारांतल्या अद्भुत कादंबऱ्यांनीं यूरोपांतील रानटी लोकांचीं हृदयें आज दोन हजार वर्षें आक्रमून टाकिलीं आहेत. आणि, रामायण भारत आणि पुराणें यांतील अद्भुत कादंबऱ्यांनीं

आज निदान अडीच हजार वर्षे हिंदुस्थानांतील हिंदुसमाजाचें नियंतृत्व पत्करलेलें आहे. पुराणांतर्गत व भारतांतर्गत अद्‌भुत कादंबऱ्यांतील प्रसंगांना हिंदुधर्मशास्त्रांत अर्वाचीन कायद्यांतील कदीम शिलशिल्याचा मान देतात व त्यांतील पात्रें उपमानादाखल घेतात. सावित्रीच्या कथेनें हिंदू स्त्रियांचेठायीं पातिव्रत्याची परंपरा ह्या कालपर्यंत लावून दिलेली आहे, आणि भारतांतील कृष्ण, भीष्म, धर्म, द्रोण, अर्जुन, अभिमन्यु ह्यांचे दाखले अर्वाचीन महाराष्ट्राच्या इतिहासांत वारंवार दिलेले आढळतात. ह्या पुराणांतील अद्‌भुत कथा अर्वाचीन कालीं इतिहास ह्मणून ज्याला ह्मणतात त्यापैकीं निःसंशय नाहींत ही तर सर्वमान्य गोष्ट आहे. काल, स्थल, प्रसंग आणि कार्यकारणभाव ह्या चार शृंखलांनीं इतिहास मर्यादित झालेला असतो. परंतु कादंबरीला ह्या चारींपैकीं कांहींची उणीव असली तरी बिलकुल नडत नाहीं. तात्पर्य पुराणांतील कथा निवळ अद्‌भुत कथा आहेत ह्यांत कांडीचाही संशय नाहीं. आणि असें असून त्यांचा समाजाच्या अनेक हालचालींवर अतोनात पगडा बसलेला तर आपण प्रत्यक्ष पहातों. किरिस्तावांचा, मुसलमानांचा, बौद्धांचा, हिंदूंचा, वाटेल त्यांचा समाज घ्या, त्याच्यावर त्या त्या धर्मांतील अद्भुत कादंबऱ्यांचा सर्वस्वी पगडा बसलेला आहे असेंच दृष्टीस पडेल. इतका हा ह्या अद्भुत कादंबऱ्यांचा प्रभाव आहे. फार लांब कशाला, गाणगापुरास नृसिंहसरस्वती ह्मणून एक सिद्ध होऊन गेले त्यांची अद्‌भुत कादंबरी त्यांच्या एका शिष्यानें रचिलेली महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहे; व तिचा पगडा हजारों लोकांच्या नित्यक्रमावर बेसुमार असलेला सर्वश्रुत आहे.

११. ही गोष्ट धर्मांतर्गत अद्‌भुत कथांची झाली. आतां धर्माखेरीज इतर प्रदेशांतदेखील अद्‌भुताचा सार्वत्रिक प्रसार किती मोठा आहे तेंही दाखवून देतां येईल. लहान मुलांकारितां सर्व राष्ट्रांत लहान लहान चिमण्याकावळ्याच्या गोष्टी सर्वत्र प्रचलित आहेत. त्यांत तर सर्व अद्‌भुतांचाच खेळ असतो. बालोपयोगी ज्या ह्या अद्‌भुत कथा त्यांचा संग्रह जर्मनींतील ग्रिम बंधूंनीं बराच करून ठेविलेला आहे. ह्या कथांचा मुलांच्या मनावरती अत्यंत जबरदस्त ठसा उमटतो. तो इतका कीं, मुलांचा बालस्वभाव व नैतिक देह ह्या अद्‌भुत कथांच्या श्रवणानेंच बहुतेक बनला जातो. हीच गोष्ट लक्षांत धरून जॅक दी जायंटकिलर वगैरे जुन्या व नव्या बालकथा यूरोपांत सचित्र छापून काढीत असतात. तसेंच प्रौढ अशा अशिक्षित मंडळींकारितांही प्रत्येक

राष्ट्रांत कांहीं लोक कथा प्रचलित असतात, व त्यांचीं नीतीचीं, व्यवहाराचीं वगैरे अनेक धोरणें ह्यां कथांवरच बांधिलीं जातात. जांवयांच्या गोष्टी, पाहुण्यांच्या गोष्टी, नवराबायकोच्या गोष्टी वगैरे अद्भुत गोष्टी आपल्या ह्या देशांत प्रचलित आहेत व त्या सर्व अद्भुतानें माखलेल्या आहेत. शिवाय निव्वळ स्त्रियांकरितां म्हणून स्त्रियांच्या कहाण्या वगैरे आहेतच. येणें प्रमाणें ह्या अद्भुताचा प्रभाव कोठें नाहीं असें नाहीं. मुलांच्या खेळांत, मुलींच्या धांगडधिंग्यांत, स्त्रियांच्या व्रतोद्यापनांत व पुरुषांच्या करमणुकींत, तसेंच राजाच्या राजवाड्यांत व शेतकऱ्याच्या झोंपड्यांत, सुशिक्षितांत व अशिक्षितांत सर्वत्र अद्भुताचें अखंड साम्राज्य आहे. ह्याच साम्राज्याच्या अमलाखालीं सुखानें नांदणाऱ्या हळवे, रिसबूड वगैरे गृहस्थानीं मराठींत अद्भुताची रचना अलीकडे करून दाखविली. ती जरी जुन्याच्या तोडीची बिलकुल नाही, तत्रापि महाराष्ट्रांतील भावी अद्भुत कादंबऱ्यांची पूर्व सूचना करण्यास हरकत नाहीं

१२. ज्याप्रमाणें अद्भुत कादंबरीची ऐतिहासिक परंपरा फार पुरातन काळापासून चालत आली आहे, त्याप्रमाणेंच आजपर्यंत ज्या ज्या शक्तीला समाजावरती आपला अम्मल बसावा अशी इच्छा उत्पन्न झाली त्या त्या शक्तीला ह्या अद्भुत कादंबरीचें सहाय्य अतोनात झालेलें आहे. एखादा नवीन धर्म जगतीतलावर अवतीर्ण झाला आणि सामान्य जनसमूहावर त्याला आपला अम्मल बसवावयाचा असला तर, त्यानें आपलीं रुक्ष तत्वें एकीकडे गुंडाळून ठेवावीं. व अद्भुत कादंबरीचा पोषाख करून लोकांत खुशाल वावरूं लागावें; त्याला जय हा हटकुन ठेवलेलाच. धर्माचें अनुकरण नीतीनें स्वराज्यप्रसारार्थ हरहमेश केलेलें आढळतें. इतकेंच नव्हे तर इतिहास ज्योतिष, वैद्यक वगैरे अनेक विद्यांनीं हाच पेहराव करून लोकप्रियता संपादन केलेली आहे. हें विधान कदाचित् कोणाला असंभवनीय वाटेल. परंतु त्याची सत्यता व्यवहारांतील दोन चार उदाहरणें देऊन सिद्ध करून दाखवितों. ज्योतिष म्हणजे काय कल्म आहे हें सर्व जगाला जाहीर आहे. ह्यावर संस्कृतांत नानाप्रकारचे ग्रंथ आहेत परंतु ते सामान्य जनसमूहाला पूर्णपणें तर सोडून द्याच परंतु अंशमात्रानेंहि कळणें दुराप्मत आहे. येणें प्रमाणें कळण्याचीच जेथें मारमार, तेथें त्या विद्येचा उपयोग कोण करून देतो?

ही गोष्ट लक्षांत घेऊन १८ व्या शेतकांतील फलज्योतिषांनीं अद्भुत कादंबरीचें स्तवन केलें व शनि, बुध, गुरु, वगैरे ग्रहांच्या अद्भुतलीलेचें अचाट पराक्रम गोड अशा कथांनीं वर्णन केलें. सामान्यजनसमूहाला कथांचें-व त्यांतल्यात्यांत अद्भुत कथांचें-वेड किती असतें हें ज्यांना माहीत आहे त्यांना सांगावयास नकोच कीं शनिमहात्म्यांचीं पारायणें अज्ञ व सुज्ञ लोकांत लाखानें होऊं लागलीं आणि फलज्योतिषांचें व त्यांच्या बरोबर भिक्षुक पुराणिक, मैदेवालें व शेजारीपाजारी यांचेहि ग्रह उच्चीप्रत पोहोचले. शनिमाहात्म्याचा मुख्य सिद्धांत हा आहे कीं शनि हा देव आहे. त्यांची पूजा जो न करील तो साक्षात परमेश्वर असला तरीहि दुःख पावेल, तेव्हां शनिचा फेरा आपल्याला केव्हां येणार आहे त्याची चौकशी फलज्योतिषाकडे करून नैवेद्यादि विधीनें शनीचें समाराधन करावें. फलज्योतिषांची हिकमत साधलेली पाहून नीतिज्ञहि पुढें सरसावले व त्यांनीं आपल्या सत्यनारायणाला कादंबरीचें स्वरूप दिलें. सत्य सोडिलें असतां कोणकोणाची कसकशी दशा झाली ह्यांच्या अद्भुत गोष्टी सत्यनारायणाच्या कथेंत सांगितल्या आहेत. नीतीचाहि असा समाजांत प्रवेश झालेला पाहुन प्रवासाचे शोकी जे पुरातन, मध्ययुगीन व अर्वाचीन आर्य लोक त्यांनीं तीर्थक्षेत्रांचीं वर्णनें व तीं उत्पन्न कशीं झालीं ह्या संबंधींच्या अद्भुत कादंबऱ्या निर्माण केल्या. अशा ह्या अद्भुत कादंबऱ्या शेकडों कार्याकरितां शेकडों झाल्या आहेत, व होत आहेत. ख्रिस्तानें तारलेल्या आत्म्याच्या गोष्टी व इतर धर्मांनीं बुडविलेल्या माणसांच्या कथा किरिस्तांव व मिशनरी छापून काढितात. त्या तरी अद्भुत कादंबऱ्याच आहेत. अलीकडे कित्येक वर्तमानपत्रांत औषधांच्या जाहिराती अद्भुत गोष्टींच्या रूपानें येतात. गोष्टींच्या अद्भुतत्वानें वाचकांचें मनरंजन व्हावें व आपल्याकडे एकदां त्यांचे मन वेधलें म्हणजे गरजेच्या वेळीं आपली त्यास पहिल्यांदा आठवण व्हावी हाच हेतू ह्या अद्भुत गोष्टींच्या जाहिरातीं देण्याचा असतो. सारांश कोणत्याही मताचा जारीनें प्रसार व्हावयाला अद्भुत कादंबरीचें साहाय्य अवश्य हवें असें दिसतें. प्रार्थनादि समाज पंथांना आपला धर्म पसरावा अशी खरोखरच इच्छा असेल तर त्यांनीं आपल्या धर्मानें किती आत्मे तारले गेले ह्यासंबंधींच्या अद्भुत कादंबऱ्या लिहून पहाव्या म्हणजे कदाचित

बहुत कार्यभाग होईल. असो. सर्स्वाभिमानी, स्वदेशाभिमानी, स्वधर्माभिमानी, स्वेतिहासाभिमानी, वगैरे सर्व अभिमान्यांच्या मेहेरनजरेपुढें ह्या कुलीन व पुरातन अद्भुत कादंबरीचे पोवाडे जितके गावे तितके थोडेच आहेत.

१३. अद्भुत कादंबरीच्या ह्या अलौकिक सामर्थ्याचें बीज काय? ज्या गोष्टी कल्पिण्याचा नुसता संकल्पही वास्तविक कादंबरीच्या मनांत यावयाचा नाहीं त्या गोष्टी धुमधडाक्यानें करतांना अद्भुत कादंबरीच्या आपण पहातों ह्यातील रहस्य काय? शांकरभाष्यांतील अवजड विचारसरणीनें किंवा बादरायणाच्या रूक्ष सुत्रमालेनें जितक्या लोकांना सनातनधर्माची ओळख झाली असेल त्यापेक्षां भगवद्गीतेंतील अद्भुत कथेनें धर्माकडे जास्त लोकांची प्रवृत्ति झालेली आहे. परंतु गजेंद्रमोक्षासारख्या अद्भुत कादंबऱ्यांनीं किंवा संतविजयासारख्या अद्भुत चरित्रांनीं धर्माकडे लोकांच्या ज्या झुंडीच्या झुंडी वळविल्या आहेत त्यांपुढें भाष्याभिमानी आणि गीताभिमानी मंडळें, एका ठिकाणीं काल असतांही, क्षुद्र कीटकवत् भासतात. तेव्हां ह्या अद्भुत कादंबरीमध्यें अशी मोहनी कोणती सांठली आहे, कीं जिच्यामुळें तिचा सर्वत्र एवढा जय येतो? ह्या प्रश्नाचें उत्तर मनुष्यमात्राच्या स्वभावांतच सांपडण्यासारखें आहे. तर्कशास्त्राच्या नियमांनी मर्यादित झालेल्या सिद्धांतपरंपरेनें आकलन करण्याची योग्यता व इच्छा समाजांतील फारच थोड्या, अतिच थोड्या व्यक्तींच्या ठायीं वास करते. बहुतेक लोक केवल तत्वाचा विचार करण्यापासून पराजितच होतात. धर्माचें नीतीचें किंवा शास्त्राचें एखादें दुसरें तत्व व्यवहारांत संचार करीत असलेलें देखिलें म्हणजे तें स्थूल मानानें ग्रहण करण्यास सामान्यजनसमूह बहुशः उत्सुक असतो निदान उदासीन तरी नसतो. आतां ज्या व्यवहारांत हें तत्व संचार करतें असें दाखवावयाचें असतें, तो व्यवहार मनुष्यप्राण्याचाच असावा लागतो असें नाहीं; देवांचा, दानवांचा, यक्षांचा किंवा किन्नरांचा असला तरीहि कोणतीच अडचण पडत नाहीं. इतकेंच कीं मनुष्य प्राण्याच्या व्यवहाराच्या धर्तीवर तो व्यवहार असला म्हणजे झालें. सौकर्यानें व विशेष प्रयास न पडतां कोणतीहि गोष्ट जाणून घेण्याची जी ही मनुष्याची लकब तीच अद्भुत कादंबऱ्यांच्या आवश्यकतेचें मुख्य कारण

होयं. जर यच्चयावत् सर्व माणसें आहेत त्याहुन बुद्धीनें व धारणेनें जास्त तीक्ष्ण व टणक असती तर अद्‌भुताची बिलकुल जरूर न पडतां. इतकेंच नव्हे तर सर्व शास्त्रांत रुक्ष असें जे वेदांतशास्त्र त्याचाच धर्म सर्वत्र चालतो आणि त्यांच्या सिद्धांतांना अद्‌भूत कादंबरीची गोष्ट पुढें देण्याचें प्रयोजन न पडतें परंतु मनुष्य समाजाची वस्तुस्थितीचें अशी आहे कीं त्याच्या मोठमोठ्या गरजा अद्‌भूतांच्या मध्यस्तीच भागल्या जाव्या.

१४. अद्‌भूत कादंबरींची हीं जी परंपरा दाखवून दिली त्यावरून एक चमत्कारिक गोष्ट कळून येते. अलीकडे महाराष्ट्रांत अशी ओरड ऐकू येऊं लागली आहे कीं समाजातील बराच मोठा पक्ष कादंबरीचा वाजवीहून फाजील भोक्ता असतो व त्यापासून त्याला म्हणण्यासारखा फायदा नाहीं. परंतु कादंबऱ्या वाचण्याचा व ऐकण्याचा प्रघात महाराष्ट्रांत आज नव्यानेंच पडला आहे असें नाहीं महाराष्ट्रांतील गेल्या आठशें वर्षांतील सारस्वताचा इतिहास पाहिला म्हणजे असें दिसून येतें कीं या देशांतील लोकांचीं बहुतेक मतें अद्भुत कादंबऱ्यांच्या वाचनानें व श्रवणानेंच आज आठशें वर्षें बनत आलीं आहेत. गीता, भारत, रामायण, इतर पुराणें व संतचरित्रें ह्यांतील अद्भुत कथांचा महाराष्ट्र भाषेंत अनुवाद ह्या आठशें वर्षांत निदान पंचवीस पंचवीस वेळां तरी झालेला आहे. इतर दुसरें सारस्वत कांहीच नसतांना ह्या अद्भुत सारस्वताच्या लाटा महाराष्ट्रजनसमुहाच्या कर्णपटलावर अप्रतिहत आदळत असलेल्या जर आपण पहात आहों, तर अद्भुत कादंबरीचें महाराष्ट्रावरील साम्राज्य आपल्याला कबूल केलेंच पाहिजे. ह्या अद्भुत कादंबऱ्या अक्षरओळख असणारी मंडळी तर फावल्या वेळीं वाचीतच. परंतु दरएक खेड्यांत व मोठ्या गांवांत व शहरांत देवळांतून देवदानवांच्या कथा ब्राह्मणादि सर्व वर्णांना व स्त्री पुरुषांना दररोज सांगणारे हजारों पुराणिक दोन माणसांच्या शिध्यावर संतुष्ट राहून समाधान मानीत असत. ह्याशिवाय विशेष प्रसंगीं हरदास मंडळी श्रोतृचातकाना ज्ञानामृत पाजण्यास उत्सुक असेच. इंग्लंडांत व अमेरिकेंत पैसे घेऊन आपल्या कादंबऱ्या वाचून दाखविणारे कादंबरीकार कांहीं आहेत. परंतु महाराष्ट्रांतील अद्‌भूत कादंबऱ्या सांगणाऱ्यांचा व वाचणाऱ्यांचा ऐकणाऱ्याचा सपाटा कांही विलक्षणच!

कोणत्याही गोष्टीचा अतिशय करण्याचा महाराष्ट्रातील लोकांचा स्वभावच आहे. व ह्या स्वभावाला अनुसरून अद्भुत कथांचाही सुकाळ महाराष्ट्रांत इतर सर्व देशापेक्षा जास्त आहे. वस्तुस्थिती व परंपरा ही अशी असल्यामुळें वीस वर्षांपूर्वी मंजुघोषादि कादंबऱ्यांचा आपल्या देशांत उदय कां झाला ह्याचें फारसें आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं.

१५. मुक्तामाला मंजुघोषा वगैरे ज्या अलीकडच्या अद्भुत कादंबऱ्या त्यांत व पूर्वीच्या धर्मादि संस्थाच्या उपयोगीं पडलेल्या कादंबऱ्या ह्यांत एक मोठें अंतर आहे. पूर्वीच्या कादंबऱ्या कांहीं एका मताच्या प्रसारार्थ निर्मिल्या गेल्या व ह्या अलीकडील कादंबऱ्यांत तसा कांहीं एक बाह्य हेतु दिसून येत नाहीं. कोणतीहि गोष्ट घेतली तरी तिचें कांहीं तरी तात्पर्य दाखवून देतां येणें शक्य आहे. ही गोष्ट अलाहिदा. परंतु सुंदर स्त्रीपुरुषांना वियोगादि संकटें येऊन त्यांचा सरतेशेवटीं सुखपर्यवसायी संयोग होतो ह्या पलीकडे ह्मणण्यासारखें तात्पर्य ह्या कादंबऱ्यांपासून निघण्यासारखें नाहीं मूळ ग्रंथकरांचीहि ह्या पलीकडे कांहीं दृष्टि होती असें दिसत नाहीं. संस्कृतांत कादंबरी, दशकुमारचरित वगैरे कल्पित कथांचा जसा इतर कांहीं बाह्य हेतू नाहीं तसाच ह्याही कादंबऱ्यांचा नाहीं. ज्या कालीं ह्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या त्या काळीं महाराष्ट्र समाजाची स्थितीच अशी होती कीं त्याचें कोणतेंहि वर्तन कोणतेंहि दुरवर धोरण धरून चाललेलें नव्हते. १८४० पासून १८६० पर्यंतचा बहुतेक सर्व समाज किंकर्तव्यतामूढ असा झाला होता. अलीकडील तीस पसतीस वर्षांत जी नाना प्रकारचीं कार्ये करण्यास आपण उद्युक्त झालों आहोंत त्यांचा त्या वेळीं मागमूसही नव्हता; आणि पूर्वींची पेशवाईच्या भर अमदानींतील जीं कार्यें व धोरणें होती त्यांचीही ओळख बुजून गेलेली होती. अशा वेळीं केवळ मनाला करमणुक म्हणून ह्या कथा लिहिल्या गेल्या. त्या लिहिणारांच्या पुढें कित्यादाखल पूर्वींच्या अद्भुत कथा, गोष्टी वगैरे होत्याच. त्यांचा त्यांनी विरामादि चिन्हें देऊन व बरीं वाईट गद्य वाक्यें लिहून विस्तृत अनुवाद केला इतकेंच. ह्या कादंबऱ्या बोलून चालून अद्भुतच होत्या, तेव्हां त्यांत अतिमानुष अशा अद्भुत गोष्टी याव्या हें साहाजिकच होतें. ह्या कादंबऱ्यांचा मुख्य वाचकवर्ग म्हटला म्हणजे मराठे संस्थानिक, जहागिरदार व इनामदार

हे लोक होत: वाणी उदमी व भटभिक्षुकही ह्या कथा वाचतांना मी पाहिलेले आहेत. परंतु ह्या कादंबऱ्यांच्या माऱ्याचा मुख्य विषय म्हटला म्हणजे हे बडे, सुखवस्तु, पैदी, खुशालचंद आणि निष्काम लोक होत. वे. शा. सं. लक्ष्मणशास्त्री हळवे यांना ह्या कादंबऱ्यांबद्दल खंडेराव गायकवाड ह्यांजकडून वर्षासन चालू होतें. ह्यावरून सदर बडे लोकांत सदर कादंबऱ्यांची किती चहा होती तें दिसून येतें सदर कादंबऱ्यांना तिखटमीठ लावून इतर मसाला घालून व त्यांत वाटतील ते फेरफार करून दिलखुष गोष्टीची बयान करणारे गोष्टीवाले कैलासवासी जमनाबाई सारख्या श्रीमंताच्या पदरी हरहमेश पडून राहिलेले सर्वत्र प्रसिद्धच आहेत.

१६ ह्या आत्मकालीन कादंबऱ्यांतही पुढें पुढें फेरबदल होत गेला १८६० च्या नंतर लोकांचीं मनें आत्मपरीक्षेकडे लागलीं व ह्या पानचट अद्भुत कथांपासून परावृत होत चालली. हें परावर्तन एकाएकी मात्र झालें नाहीं. मुक्तामाला, मंजुघोषा वगैरे कादंबऱ्यांचा सूर्य माध्यान्हाचलावर येतो न येतो तोंच विचित्रपुरीसारख्या एक दोन कादंबऱ्या क्षितिजावर दिसूं लागल्या. विचिपुत्ररी ही कादंबरी आहे अद्भुत कोटींतीलच परंतु तींत विशेष हा आहे कीं ती कांहीं एका हेतूनें लिहिली असून पुष्कळ अद्भुत गोष्टींचा उपहास तींत केला आहे. विचित्र पुरींतील मुख्य पात्रांचा जो इतिहास आहे तो अद्भुत आहे. परंतु तींतील मुख्य नायक व त्याचे मित्र भुताखेतांचे व पिशाचराक्षसांचे कट्टे शत्रू म्हणून दाखविलेले आहेत. येथें अद्भुत व वास्तविक ह्या दोन भावनांचा संगम झाला व हा असाच संगम होणें शक्य आहे. अद्भुतावरून वास्तविकावर एकदम उडी जाणें सर्वथा अशक्य. युरोपांतही हा असाच प्रकार झाला आहे. १६ व्या शतकापर्यंत युरोपांतील स्पेन, पोर्तुगाल, फ्रान्स वगैरे देशांत अद्भुत कादंबऱ्यांचा इतका कांहीं सुळसुळाट झालेला होता कीं धर्म, शास्त्र वगैरे अनेक दिशांनीं युरोपांतील लोकांचें जेव्हां आत्मपरीक्षेकडे व सुधारणेकडे लक्ष गेलें तेव्हां अद्भुताचा वास्तविकाशीं संयोग घडून अद्भुताचें परावर्तन झालें राब्लेच्या गार्गाचुया व पांटाग्रूएल ह्या कथेचा सर्व पोषाख अद्भुत कादंबरीचा आहे. आंतील विचार मात्र येथून तेथून वास्तविकाच्या रंगानें भिनलेले आहेत. सर्व्हांटिसाच्या डॉन्

किशोट नामक कादंबरीचाहि प्रकार असाच आहे. पुर्वीच्या अद्भुत कादंबऱ्या व त्यांतील अद्भुत वीर ह्यांची टर उडविण्याच्या हेतूनें ही कादंबरी लिहिलेली आहे परंतु हिचा सर्व पेहराव अद्भुत कादंबरीचाच आहे. हाच मासला लसाजच्या जिल्ब्लास नांवाच्या कादंबरीचा आहे. सारांश काय कीं, सारस्वतांतहि जे फेरबदल होतात ते देखील पाहिरी-पाहिरीनेंच होतात.

१७. अद्भुताचा व वास्तविकाचा विचित्रपुरीत संगम झाल्यावर केवळ वास्तविकाचे प्राधान्य ज्यांत आहे अशा कादंबऱ्यांचा काळ १८७० नंतर लवकरच आला व तो अद्यापपर्यंत चालू आहे. ह्या वास्तविकाची स्फूर्ति मराठी लेखकांना प्रायः इंग्रजीपासून झालेली आहे. अद्भुत कादंबरीची पूर्वपीठिका जशी ह्या देशांतील असून बहुतेक अनादि, निदान दोन अडीच हजार वर्षांची आहे; तशी वास्तविक कादंबऱ्यांची कुळकथा फारशी मोठी नाहीं. ह्यांचा मुख्य झरा परदेशांतला आहे व ह्यानीं आपला कित्ताहि तिकडील सामान्य कादंबऱ्याचाच उचलला आहे. परंतु यूरोपांत वास्तविक कादंबरीचे जे उत्तमोत्तम व सर्वोत्कृष्ट झरे आहेत त्यांच्या उगमाशीं जाऊन तेथून स्फूर्ति घेऊन आलेले मत्तभृंग आपल्या इकडे फारसे कदाचित मुळींच नाहींत. इंग्रजी कादंबरीकारांतील अत्यंत रद्दड असा जो रेनोल्डस् त्यांच्या भिकार कादंबऱ्याचाच आस्वाद घेणारे हरीचे लाल आपल्या इकडे पुष्कळ! कोणी रेनोल्डसच्या पलीकडे भरारी मारलीच तर ते मिसेस हेनरी वुड, लॉर्ड लिटन, वगैरे सामान्य ग्रंथकारांपर्यंत जाऊन धडकले म्हणजे हद्द झाली ! त्यांच्या पलीकडे गेलेला सहृदय एखाद दुसरा असल्यास नकळे. आणि यदाकदाचित असला तरी मूळ झऱ्याची लज्जत लुटून घेऊन येऊन ती आपलीशी करणारा कोण बहाद्दर असेल तो असो. तो ज्याचा त्यालाच माहीत ! अजून त्यांची वार्ता जगाला कळायाचीच आहे !

१८ वास्तविक गोष्ट अशी आहे कीं वास्तविक कादंबरीकाराची पदवी पटकावूं पाहाणाऱ्या आपल्या इकडील गृहस्थांना आपल्या कलेच्या इतिहासाचें, तिच्या परंपरेचें, तिच्या ग्रंथसंपत्तीचें व तिच्या मर्माचें जसें ज्ञान असावें तसें प्रायः नसतें. आपल्या कलेचे उत्कृष्ट वस्ताद कोण व तींतील लुंगेसुंगे तमासगीर कोण ह्याची ओळख नसल्यामुळें अनुकरण

कोणाचें करावें व कोणाचें करूं नये ह्याचाच निश्चय त्यांना झालेला नसतो. नवशिक्या भांबावलेल्या पोराप्रमाणें जें कांहीं नवें पाहावें तें उत्तमच असेल असा त्यांचा ग्रह होतो. इतकी मनाची उथळ व कोती स्थिती असल्यावर, जी कोणती गोष्ट हातीं पडेल ती मराठींत उतरावी, आणि मायभाषेची आपण सेवा केली म्हणून तिला आपले उतराई होण्यास सांगावें ह्याखेरीज त्यांना दुसरी तोडच रहात नाहीं. प्रस्तुतकालीं मराठींत गोष्टी लिहिणारी बहुतेक सर्व मण्डळी ह्या असल्याच मासल्याची आहेत. आधीं भाषान्तरावरच पोट भरणारे बहुतेक सर्व आहेत. त्यांत एखादा दुसरा स्वतंत्र ग्रंथरचना करणाराही आढळतो. परन्तु त्याचीही मति एखाद्या इंग्रजी किंवा फ्रेंच सामान्य कादंबरीकाराच्या एखाद्या कादंबरीवरूनच स्फुरण पावलेली असते असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. एखाद्या परदेशी कादंबरीकाराचें संविधानक व पात्रें घ्यावीं, त्यांना मराठी नांवें द्यावीं, चालीरीतींत योग्य तो फेरफार करावा, व शेवट मुळाच्या उलट किंवा सुलट करावा. ह्यापलीकडे स्वतंत्र ह्मणून वाखाणलेल्या आपल्या इकडील कादंबरीकाराची उडी गेलेली नसते. हा असा प्रकार कां? जें इंग्रज किंवा फ्रेंच, जर्मन किंवा रशियन कादंबरीकार लिहू व कल्पूं शकतो, तें लिहिण्याचें किंवा कल्पिण्याचें सामर्थ्य आमच्या इकडील कादंबरीकारांत नसावेंच काय ? तिकडील ग्रंथकाराचा स्पर्श झाल्याशिवाय ह्यांच्या लेखणीनें स्फुरण पावूंच नये काय ? ह्या प्रश्नांना उत्तर असें आहे कीं, हें सर्व इकडील ग्रंथकारांना शक्य आहे. इतकेंच कीं, त्यांच्याप्रमाणें आपल्या इकडील होतकरू लेखकांनीं नानाप्रकारची मेहनत मनोभावानें केली पाहिजे, आणि इतकेंही करण्याचें साहस ज्यांच्या अंगीं असेल त्यांना कांहीं ईश्वरदत्त गुणांची जन्मतःच प्राप्ति असली पाहिजे. हें शेवटलें वाक्य गूढ असें भासण्याचा संभव आहे. सबब त्याची फोड किंचित विस्तारानें करतो.

१०. इंग्लिश मासिक पुस्तकांतून व वर्तमानपत्रांतून हप्त्याहप्त्यांनीं येणाऱ्या कादंबऱ्यांच्या स्वरूपाच्या कादंबऱ्या आपल्या इकडील करमणूक व मासिक मनोरंजन ह्या दोन स्थलीं येत असतात. कांहीं अपवाद खेरीजकरून ह्या इंग्लिश पत्रांतील व पुस्तकांतील कादंबऱ्या योग्यतेच्या मानानें सरासरीच असतात. सरासरी म्हणजे गचाळ असा म्हणण्याचा

भाग नव्हे सरासरी म्हणजे नामांकित नव्हे, एवढेंच दर्शविण्याचा आशय आहे. ह्या हप्त्यांनीं येणाऱ्या कादंबऱ्यांत स्कॉट, डिकन्स, थॅकरे, बाल्झाक, ह्यूगो, डूमास, झोला, टाल्स्टॉय ह्या वस्तादांच्या हातून उतरलेल्या कादंबऱ्यांच्या तोडीच्या कादंबऱ्या क्वचितच असतात इंग्रजी वर्तमानपत्रांतील व मासिक पुस्तकांतील हप्त्याच्या कादंबऱ्यांची जर ही अशी योग्यता आहे, तर त्यांचे केवळ अनुकरण करणाऱ्या व त्यांशीं स्पर्धणाऱ्या आपल्या इकडील कादंबऱ्याची योग्यता वर उल्लेखिलेल्या वस्तादांच्या कादंबऱ्यांहुन किती कमी असली पाहिजे ह्यांचा अंदाज सहजासहजीं होण्यासारखा आहे. परंतु मराठींतील ह्या कादंबऱ्यांची योग्यता ह्या तुलनेनेंच जोखून काम भागण्यासारखें नाहीं. यूरोपियन प्रख्यात कादंबरीकारांची उत्कृष्टता कोणत्या स्वरूपाची आहे व युरोपियन लोकमताच्या प्रगत्यर्थ व शिक्षणार्थ ह्या कादंबऱ्याचा काय उपयोग झालेला आहे ह्याचें संक्षेपतः दिग्दर्शन केल्यानें तें काम उत्तमोत्तम होणार आहे.

२०. युरोपांतील गेल्या तीनशें वर्षांतील एकंदर कादंबऱ्या घेतल्या तर त्याचे मोठमोठे असे दोन विभाग पडतात,—पहिला व्यक्तिविषयक कादंबऱ्यांचा व दुसरा समाजविषयक कादंबऱ्याचा. वैयक्तिक कादंबऱ्यांत केवळ व्यक्तींच्याठायीं नियमानें आढळणारे जे कामक्रोधमदमत्सरलोभमोह हे षड्रिपु त्यांच्या संकोचविकोचाचें चित्र काढिलेलें असतें. ह्या चित्राची व्याप्ति व्यक्तिमात्राच्या पलीकडे फारशी कधीं जात नाहीं. ह्याच्यापासून वाचकाच्या मनावर वैयक्तिक नीतीचाच तेवढा बोध होतो ह्या वर्गातील कादंबऱ्यांचे अनेक प्रकार आहेत. सामान्य नित्याच्या संसारांतील दोन स्त्रीपुरुष घ्यावयाची. त्यांच्या चमत्कारिक लकबांतील त्या अतिशयानें वर्णावयाच्या त्यांच्या सुखदुःखाचें चटकादार वर्णन द्यावयाचीं. अधुन मधून घरें बगीचे डोंगरे नद्या ह्यांच्या आपलीं पात्रें वाचकांच्या डोळ्यांत भरावयासाठीं प्रभावळी काढावयाच्या आणि सरतेशेवटीं त्याची समाप्ति बरी किंवा वाईट करावयाची; हा बहुतेक सर्व वैयक्तिक वास्तविक कादंबऱ्यांचा विषय असतो. Society ladies च्या society novels म्हणून ज्यांस इंग्लंडांत ओळखतात त्या कादंबऱ्या ह्यांत. ह्या खुशालचंद्र अशा स्त्रीपुरुषांच्या करमणुकीचा विषय होतो. पश्चिमेकडे असल्या कादंबऱ्या

कुत्र्याच्या छत्रीप्रमाणें दररोज दहा पांच उगवतात. त्यांच्यापासुन व्यक्तिमात्राला काय करमणूक होत असेल ती असेल राष्ट्रांच्या स्वभावावर त्यांचा म्हणण्यासारखा कांहींच परिणाम होत नाहीं. ह्या मिळमिळीत प्रकाराहून दुसरा असा एक वैयक्तिक कादंबऱ्यांचा वर्ग आहे. त्याचें मुख्य लक्षण कोणत्याही विकाराचा तीव्रपणा हें होय तीन मजल्यांच्या society novels बड्या बड्या स्त्रीपुरुषांकरितां ह्मणून मुद्दाम तयार केल्या असल्यामुळें त्या होतील तितक्या मिळमिळीत, गुळगुळीत, सपक नरम व आवेशहीन करण्यांतच सभ्यपणाचा कळस झाला अशी समजूत आहे. ह्या मिळमिळीत सभ्यपणाच्या उलट तीव्र कादंबऱ्यांचा मार्ग असतो ह्मणजे इंग्लंडांतील मध्यस्थितींतील व कनिष्ट स्थितींतील स्त्रीपुरुषांकरितां ह्या गोष्टी लिहिल्या असल्यामुळें तीव्र विकाराचें प्रदर्शन त्यांत अप्रतिबद्ध केलेलें असतें. ह्याही कादंबऱ्या व्यक्तिमात्राला काय त्या गोड वाटत असतील. त्यां समाजावर त्यांचा कांहींएक परिणाम नसतो. वैयक्तिक कादंबऱ्यांचें आणखीही कित्येक भेद आहेत. शाळेंतील मुलांकरितां, वाणीउदम्यांकरितां, नावाड्यांकरितां, शिपायांकरितां, प्रवाशांकरितां, पोलिसांकरितां, अशा नानाप्रकारच्या व्यक्तींच्या करमणुकींकरितां वैयक्तिक कादंबऱ्यांचे नानाप्रकार आहेत. त्यांचा मुख्य हेतू करमणूक हा असतो. ह्यापेक्षां विशेष खोल विचार त्यांत केलेला नसतो. गरजू लेखक, थोडेंबहूत शिकल्यासवरलेल्या तरुण स्त्रिया, वगैरे असल्याच दर्जाचीं माणसें असल्या कादंबऱ्यांचा कारखाना चालवितात. मास्तरकी खर्डेघाशी दुकानदारी वगैरे धंदे करणाऱ्यांचीच ही अकली वास्तविक कादंबऱ्यांच्या लेखनांकडे वळलेली असते एवढें सांगितलें ह्मणजे ह्या कादंबऱ्याच्या योग्यतेचा अंदाज सहज होईल.

२१ व्यक्तिविषयक कादंबऱ्यांच्या खटाऱ्याचा मैला सोडून दिला. म्हणजे पुढें मनुष्यमात्राच्या उच्च व नाजूक विकारांचे व विचारांचें प्रदर्शन ज्यांत केलेलें असतें अशा व्यक्तिविषयक कादंबऱ्यांची उत्तेजक हवा लागते. देशप्रीति, लोकोपकार, वात्सल्य, प्रेमबंधन, वगैरे उदात्त भावनांची चिकित्सा ह्या कादंबऱ्यांतून होत असते. गोल्डस्मिथ, फील्डिंग स्मॉलेट, रिचर्डसन्, आस्टिन, स्कॉट, थॅकरे, डिकन्स, इलियट वगैरे नामांकित कादंबरीकारांनीं आपलें कौशल्य सर्वस्व ह्या कामीं खर्चिलेलें

आहे. ह्या कुशल कारागिरांच्या हातून अशीं अनेक पात्रें निर्माण झालेलीं आहेत कीं त्यांची ओळख इंग्लंडांतील बहुतेक सुशिक्षित लोकांना चांगली झालेली आहे. गोल्डस्मिथचा व्हिकार, स्मॉलेटचा अंकल टोबी, फिल्डिंगचा ऑलवर्दी, स्कॉटचा आयव्हनो, डिकन्सचा पिकविक, ईलियटची रोमोला, वगैरे पात्रें इंग्रजी भाषेंत सर्व प्रसिद्ध आहेत. ह्या इंग्रज कादंबरीकारांच्याच तोडीला बाल्झाक, डूमास, वगैरे फ्रेंच कादंबरीकार बसविले पाहिजेत. इतकेंच कीं, कोंवळीं पोरें आणि धणधकट जवान ह्यामध्यें जें अंतर असतें तेंच ह्या इंग्लिश व फ्रेंच ग्रंथकारांत आहे. सतराव्या शतकांतील इंग्लिश राज्यक्रांति ह्यामध्यें जें जमीन अस्मानाचें अंतर आहे, किंवा लंडनांतील सेंट पॉलचें देऊळ व पारिसांतील ईफेलचा बुरुज ह्यांत जें उंचीचें बेसुमार अंतर आहे, किंवा इंग्रज लोकांनीं लिव्हरपुल—मांचेस्टर कालवा व बारन लेसेप्स ह्यानें बांधिलेला सुएझचा कालवा ह्यामध्यें जें अपरंपार अंतर आहे, तेंच अंतर इंग्लिश कादंबरीकार व फ्रेंच कादंबरीकार ह्यामध्यें आहे. डूमास व त्याचे साथीदार ह्यांनीं मिळून सरासरी दोन हजार कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. इतक्या कादंबऱ्या उपरिनिर्दिष्ट सर्व इंग्रज ग्रंथकारांच्याही नाहींत. बाल्झाकही असाच जंगी लेखक होता. ह्यानें आपल्या ग्रंथांना ' मानवी नाटक' असें अनुरूप नांव दिलेलें आहे बाल्झाक व डूमास ह्यांची लेखनशैली उत्कृष्ट असून मानसिक विकारांचे पृथक्करण त्यांनीं फारच नामी केलेलें आहे. तसेंच बहुतेक इंग्रज ग्रंथकार व्यक्तीला सोडून फार बाहेर कधीं जात नाहींत. बाल्झाक व डूमास ह्यांचा कल व्यक्तीपेक्षां समाजाकडे विशेष आहे. हा समाजाचें गुणदोषवर्णन करण्याचा कल फ्रान्सांत, रशियांत व युरोपांतील इतर देशांत इतका कांहीं वाढला कीं, त्याच्या तोडीचें इंग्लंडांतील कादंबरीप्रदेशांत म्हणण्यासारखें कांहींच दाखविण्याजोगें नाहीं. ह्या बाबतींत इंग्लंड युरोपच्या व विशेषतः फ्रान्स व रशिया ह्यांच्या फारच पाठीमागें आहे. सामाजिक व राष्ट्रीय कादंबऱ्यांचा उत्कर्ष फ्रान्सांत व रशियांतच कां व्हावा व इंग्लंडांत कां होऊं नये, तसेंच इंग्लंडानें ह्या बाबींत उष्ट्या भाषांतरावर आपली भूक कां भागवावी व स्वतंत्र ग्रंथ रचना कां करूं नये, ह्याची कारणें मोठीं मनोरंजक व चमत्कारिक असून नमूद करण्यासारखीं आहेत.

२२ प्रत्येक राष्ट्राला कांहीं आणीबाणीचे प्रसंग येतात. दास्यांतून स्वतंत्र होतांना, जुलमाच्या शृंखला तोडतांना, सामाजिक अडचणी दूर करतांना, राष्ट्रांना आटोकाट मेहनत करावी लागते. व ही मेहनत होत असतांना, समाजाचा आवेश कायम ठेवण्याकरितां, त्याच्या विचारांना योग्य वळण देण्याकरितां, इष्ट वस्तूची कल्पना त्याच्या मनांत ठसविण्याकरितां, लेखनकलाकुशल असे सरस्वतीचे कांहीं प्यारे त्या त्या राष्ट्रांत अवतीर्ण होत असतात. राष्ट्रीय विचारांचे व विकारांचे आवेशयुक्त प्रदर्शन शब्दांनीं करण्याचें काम ह्या प्रासादिक लोकांचे असतें हे लेखक नानाप्रकारचीं हत्यारें घेऊन आपलें काम करून जातात. कोणी नाटकांच्या द्वारा कोणी इतिहासाच्या द्वारा कोणी कादंबऱ्यांच्या द्वारा, कोणी कवितेच्या द्वारा कोणी वर्तमानपत्राच्या द्वारा कोणी धर्मव्याख्यानांच्या द्वारा अशा नानाद्वारांनीं हे सरस्वतीभक्त आपापलें कार्य करीत असतात. अठराव्या शतकांत अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें स्वतंत्र झालीं त्यावेळीं समाजांतील विचारांच्या आवेशाचें प्रदर्शन टामस् पेन् यानें Common Sense ( सारासार विचार ) सारख्या निबंधांतून व जेफर्सन वगैरेनें Federalist ( संयुक्तसंस्थावादी ) सारख्या वर्तमानपत्रांतील लेखांतुन फारच जोरदार असें केलें. चवदाव्या शतकांत व एकोणिसाव्या शतकांत हें काम इटालींत व्याख्यात्यांनीं केलें. अठराव्या शतकांत फ्रान्सांत जी थोरली राजकीय, सामाजिक, औद्योगिक, व धार्मिक क्रांति झाली, तिचे विचार प्रकट करणारे रूझो, व्होल्टेअर, डिडरो वगैरे प्रचंड कादंबरीकार, नाटककार, निबंधकार व शास्त्रज्ञ असे लोक होते. तो खटाटोप ज्या मानानें मोठा होता त्या मानानें त्याचे प्रदर्शकही महान् महान् ग्रंथकार होते. पस्तीस चाळीस वर्षांपूर्वीं अमेरिकेंत गुलामाना बन्धमुक्त करण्याबद्दल लढाई झाली, तिचें रहस्य व महिमा मिसेस स्टौकृत अंकल टॉम नांवाच्या कादंबरीनें प्रसिद्ध केला. सध्यां रशियांत आज पन्नास साठ वर्षें जी मोठी सामाजिक व राजकीय उलाढाल होत आहे, तिचे मुख्य वक्ते रशियांतील कादंबरीकारच आहेत. सारांश जेव्हां जेव्हां एखादें राष्ट्र जगाच्या रंगभूमीवर प्रमुख पात्राचें काम करण्याचें अवसान दाखवितें, तेव्हां तेव्हां त्या अवधानाचे सूचक, दर्शक व प्रोत्साहक असे शब्द कोणत्या नाहीं कोणत्या तरी रूपानें त्या राष्ट्रांतील ग्रंथकाराच्या

लेखणींतून व तोंडांतून पडतात. सतराव्या व आठराव्या शतकांत महाराष्ट्राच्या अंगांत सर्व भरतखण्डाला स्वतंत्र करण्याचा जेव्हां आवेश भरला, तेव्हां त्या आवेशाचें प्रदर्शन मराठी भाषेंत झालेल्या रामायणभारतादि कथांच्याद्वारें झालें. सर्वांत रामदास व मुद्गल ह्यांच्या रामायणांचा प्रभाव महाराष्ट्रसमाजावर अतोनात झाला. ऐतिहासिक लेखांच्या शोधार्थ निरनिराळ्या प्रांतांतून हिंडतांना मला असें आढळून आलें कीं, रामदासाचें व मुद्गलाचें युद्धकांड किल्ल्यांतून व सैन्यांतून शिपाई नित्य वाचीत असत. ह्या रामायणांतील कांहीं चित्रें मजजवळ आहेत, त्यांत रावणाला व राक्षसांना मुसलमानांचे पेहराव, चेहरे व रंग दिलेले आहेत आणि राम व माकडें क्षत्रिय व मराठे म्हणून दर्शविलेले आहेत.

२३ आणीबाणीचे प्रसंग आले म्हणजे महत्वाचे उद्गार बाहेर पडतात हा सिद्धांत आहे. अर्थात आणीबाणीचे प्रसंगच जेथें आले नाहींत तेथें असे उद्गार बाहेर पडण्याचें कारणच उद्भवत नाहीं; आणि तोच प्रकार इंग्लंडचा झालेला आहे. अलीकडे पाऊणशें वर्षांत व त्यांतल्यात्यांत गेल्या पन्नास वर्षांत संपत्तीच्या पुरांत डुबून गेल्यामुळें विद्या, कला, कौशल्य, उदीम, व्यापार, यंत्रशास्त्र, वगैरे सर्वत्र इंग्लंडचे अत्यंत दुर्लक्ष होत चाललें आहे. ह्या संपत्तीच्या पुराला व्यापार वगैरे कारणें झालीं? असें सांगतात. परन्तु इंग्लंडच्या संपत्तीचें एकच मोठें कारण म्हटलें म्हणजे हिंदुस्थान हें होय. हें कारण जोंपर्यंत विद्यमान आहे, तोंपर्यंत इतर राष्ट्राप्रमाणें इंग्लंडला कशाकरितांही आक्रोश करण्याची काडीची जरूरी नाहीं व इच्छाही होणें अस्वाभाविक होय. विद्यमान राजकीय, सामाजिक व औद्योगिक स्थितींतच श्रीमंतांचे सर्व सोहाळे भोगावयास सांपडतात, तर ती बदलण्यास कोणता सुखवस्तू माणूस तयार होईल? १८६० पर्यंत आपल्या स्थितींत कांहीं बदल असावा असें वाटणारी इंग्लंडांत भिन्न मण्डळी होती. अलीकडील ४० वर्षांत तो मनु बदलला आहे. सध्यां जमल्यास रोमन साम्राज्यासारखें सर्व पृथ्वीवर एकच साम्राज्य करावें असा इंग्लंडचा मोठा डाव आहे. प्रथम काळे लोक असतील त्यांचे चेंगुगवाळें उचलावें व नंतर रोमन कार्थेज वगैरे देश पादाक्रांत करून आस्ते आस्ते सर्व ज्ञात पृथ्वीचें जसें साम्राज्य पटकाविलें, तसें फ्रान्स, जर्मनी, रशिया, यूनायटेड स्टेटस वगैरे एकेक राष्ट्राला पादाक्रांत करीत

करीत शेंदोनशें वर्षांत सर्व पृथ्वीच्या चक्रवर्तित्वाला हात घालावा, असें लांबचें धोरण इंग्लंडांतील कित्येक पुरुषानीं बांधिलेलें असावें, असें त्यांच्या रोमन साम्राज्याच्यासंबंधानें वेळोवेळीं उद्गारांवरून वाटतें. फ्रान्सा सारखीं गडबडी राष्ट्रें समाजांत व राज्ययंत्रांत अशी सुधारणा करावी आणि तशी सुधारणा करावी वगैरे प्रयोग करण्यांत गुंतली आहेत, तों संधि साधून फ्रान्सचें राज्ययंत्रच मुळींच आपल्या हातांत घ्यावें, असा कोणाचा मनोदय असल्यास तो केवळ अशक्यच आहे, असें म्हणतां येत नाहीं. इतकेंच कीं, हें साधण्यास अक्कल व सद्दी ह्यांचें सहाय पाहिजे. इंग्लंडाचे विचार हे असे साम्राज्याकडे वळल्यामुळें सामाजिक, धार्मिक, राजकीय वगैरे सामान्य गोष्टींच्या सुधारणेकडे लक्ष फेकण्यास त्याला आतां अवकाश नाहीं. अर्थात इंग्लंडांतील ग्रंथकर्तेही त्यासंबंधीं कळकळीनें लिहीत नाहींत. एक ग्रंथकर्ता मात्र इंग्लंडचें हृदय पुर्णपणें जाणतो, आणि तो कोण हर्र जगत्प्रसिद्ध रुडयार्ड किप्लिंग हा होय. त्यानें इंग्लंडाच्या मनांतल्या मनोगतांचें प्रदर्शन यथास्थित केलें आहे. साम्राज्यलब्धि हा इंग्लंडचा प्रस्तुतचा मुख्य पुरुषार्थ आहे. इतर कोणतीही गोष्ट इंग्लंड जाणत नाहीं व कोणी जाणवूं लागला तर ऐकत नाहीं. अशा स्थितींत मनुष्यजातीच्या अत्युच्च व उदात्त विचारांचें जे केवळ सागर, ते ग्रंथ इंग्लंडांत कसे निर्माण व्हावे ? स्वातंत्र्याच्या, प्रगतीच्या आणि सामाजिक, धार्मिक व राजकीय सुधारणेच्या सिद्धांतांनीं सध्यां परदेश पहावा हेंच सोयीचें दिसतें !

२४. इंग्लंडाच्या पुरुषार्थाची दिशा ही अशी पडल्यामुळें फ्रान्सांतील किंवा रशियांतील राष्ट्रीय किंवा सामाजिक कादंबऱ्यासारख्या कादंबऱ्या त्या देशांत प्रस्तुत कालीं निपजत नाहींत. अठराव्या शतकांतील क्रांतीनें फ्रान्सांतील समाजाला जें चलन मिळालेलें आहे, त्याच्यामुळें समाजांतील व्यंगें बाहेर काढण्याकडे व तो पूर्णतेच्या दिशेप्रत नेण्याकडे तिकडील सर्व विचारी लोकांचें लक्ष लागलेलें आहे. मोठमोठे कारखानें, शहरें कौंसिलें, पेढ्या वगैरे ठिकाणीं अनीतिचें साम्राज्य केवढें जुलमाचें आहे, समाजांतील कांहीं वर्ग इतर वर्गांना किती अन्यायानें वागवितात, शास्त्रापुढें धर्माचें नव्हे धर्मसंस्थाचें प्रस्थ किती पोकळ पडत चाललें आहे वगैरे गोष्टींचा खल शास्त्रज्ञाप्रमाणें फ्रान्सांतील कादंबरीकारही करतात,

व्हिक्टर ह्यूगोची The Miserables किंवा झोलाची पारिस ही कादंबरी घेतली म्हणजे फ्रेंच समाजाच्या पोटांत कोणता वडवाग्नि पेट घेतो आहे तें कळतें. व हेंच कळविण्याचा ह्या ग्रंथकारांचा मुख्य हेतू आहे. रशियन समाजाचीहि अशीच स्थिती झालेली आहे. फ्रान्सची राज्यपद्धति पृथ्वीवरील सर्व देशांपेक्षां उदार व स्वतंत्र असल्यामुळें विचारी पुरुषांना आपले विचार कोणताही प्रतिबंध न होतां प्रदर्शित करतां येतात. त्यामुळें वर्तमानपत्रें मासिक पुस्तकें कविता कादंबऱ्या नाटकें इतिहास वगैरे नाना तऱ्हांनी फ्रान्सांत विचारांचें प्रदर्शन होण्यास कोणतीच हरकत पडत नाहीं. तेंच रशियांत अनियंत्रित राजसत्ता असल्याकारणानें मुद्रणाचें स्वातंत्र्य नाहीं आणि लोकांना आपले विचार योग्य मार्गानीं प्रसिद्ध करतां येत नाहींत ह्याचा असा परिणाम झाला आहे. कीं १८४० पासून म्हणजे गोगोल यानें आपली पहिली कादंबरी छापिल्याच्या काळा. पासुन तों आतांपर्यंत रशियन ग्रंथकारांनीं राष्ट्रीय अशा सर्व वासना कादंबरीच्याद्वारा प्रगट केल्या आहेत गोगोल, गोशाराफ, बिसेन्स्की, दोस्तोव्हस्की, टूर्गेनेफ, व टॉलस्टॉय वगैरे नामांकित कादंबरीकार आजपर्यंत रशियांत झाले. पैकीं कौंट टॉलस्टॉय याच्या प्रख्यात कादंबऱ्या म्हटल्या म्हणजे Les Cosaques Guerreet Paix. Auua Karenina वगैरे होत. रशियांतील तरुण पिढींतील लोकांच्या मतांची रचना ह्या कादंबऱ्यांच्या सेवनानें झाली आहे. एवढें सांगितलें म्हणजे राष्ट्ररचनेंत ह्या ग्रंथांचें कार्य काय ह्याचे निराळें वर्णन करण्याची जरूर नाहीं.

२५. टॉलस्टॉय, झोला, ह्यूगो ह्यांनीं लिहिलेल्या कादंबऱ्यांच्या तोडीची इंग्लिश भाषेंत एकही कादंबरी नाहीं. जगांतील सर्व राष्ट्रांना प्रसिद्ध अशा निरनिराळ्या भाषांतील कादंबऱ्यांची गणना केली तर, त्यांत इंग्लंडांतील दोन तीन व अमेरिकेंतील एकाच कादंबरीचा समावेश करावा लागेल. Pilgrim's Progress, Gulliver's Travels, Robinsan Crusoe आणि Uncle Tom's Cabin ह्या चार कादंबऱ्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही कादंबऱ्या इतर राष्ट्रांना सरसहा माहीत असतील असें म्हणवत नाहीं. पैकीं पहिल्या तिहींत अद्भुताचा खेळ अतोनात आहे. चौथी सर्वमान्य असुन इतिहासांत तिचें कार्य फारच नांव घेण्याजोगें झालें आहे. पहिल्या तीन यद्यपि अद्भुतांतील

आहेत. तथापि त्याचाही इंग्लिश राष्ट्राला थोडा थोडका उपयोग झाला नाहीं. पहिलीनें धर्म व नीति ह्यांचा प्रसार केला. दुसरीनें समाजांतील नानाप्रकारचे भ्रम, औपरोधिक पद्धतीनें मोडण्याचें श्रेय घेतलें व तिसरीनें इंग्लंडांतील तरुणांना साहसी प्रवासी केलें. ह्या तिन्ही कादंबऱ्या दीडशें वर्षांच्या पूर्वीच्या आहेत. त्यांच्यापुढें त्यांच्या तोडीचीं अशीं पुस्तकें इंग्लिश भाषेंत अद्यापपर्यंत झालीं नाहींत. राष्ट्रीय कार्य करणाऱ्या इंग्लिश भाषेंतील कादंबऱ्या ह्या एवढ्याच.

२६. इंग्लंडांतील उत्तम कादंबऱ्या कोणत्या त्या देशांत कादंबरीची स्थिती सध्यां कोणत्या प्रकारची आहे आणि फ्रान्स व रशिया ह्या देशांतील उत्कृष्ट वास्तविक व अद्भुत कादंबरीकार कोणते, ह्यासंबंधानें येथपर्यंत चार शब्द सांगितले. त्यावरून आपल्या मराठींत ज्या सध्या वास्तविक कादंबऱ्या झाल्या आहेत, त्यांची योग्यता काय व प्रस्तुतच्या मराठी कादंबरीकारांच्या हातून अपेक्षा कोणती करावयाची, ह्याचा अंदाज करतां येईल.

२७. प्रस्तुतच्या मराठी कादंबरीकारांत स्वतंत्र अशी ग्रंथरचना मोठ्या प्रमाणावर करणारा असा एकच ग्रंथकार आहे. रा॰ रा॰ हरी नारायण आपटे ह्यांच्या कृतींनीं बऱ्याच लोकांचें मनोरंजन झालेलें आहे. व पुढेंही तें जास्त प्रमाणावर होईल अशी आशा आहे. परंतु व्यक्तिविषयक कादंबऱ्या लिहिण्यापलीकडे ह्यांचा धाव अद्यापपर्यंत गेली नाहीं इंग्लंडांतील society novels पेक्षां ह्यांच्या कादंबऱ्या सरस आहेत परंतु डिकन्स थॅकरे वगैरेंच्या तोडीला ह्यांचा कोणताही ग्रंथ बसवितां येईल. असें वाटत नाहीं. ह्युगो, झोला, टॉलस्टॉय ह्यांच्यापासून तर हे फारच दूर आहेत. महाशब्दे, शंखध्वनि, बुलीस्नीक, फेअरब्रेन, प्रो॰ ब्यांडी वगैरे कांहीं कांहीं पात्रें ह्यांनीं खरींच नामांकित अशीं निर्माण केलीं आहेत. परन्तु तीं जितकीं उठून दिसलीं पाहिजेत तितकीं दिसत नाहींत. ह्यांच्याहीपेक्षां कित्येक बाबींत उत्तम अशी एक कादंबरी एका ग्रंथकारानें लिहिलेली आहे. ती कादंबरी रा॰ ओककृत शिरस्तेदार ही होय. हींत मोठा दोष म्हटला म्हणजे ही फार सूक्ष्म प्रमाणावर धरलेली आहे. हिचें रूपुस्त जर वाढविलें असतें व त्या रूपुस्तांत अघटित चमत्कारांचें वर्णन केलें असतें, म्हणजे शिरस्तेदाराचा, मामलतदार, दप्तरदार, कौन्सिलराहि

यद्यपि झाला, तत्रापि त्याचा कारकुनी बाणा सुटावयाचा नाहीं अशा तऱ्हेची जर ह्या ग्रंथाची सांगोपांग उठावणी झाली असती, तर हिंदुस्तानांतील पांच रुपयांपासून पांच हजारापर्यंतच्या कारकुनी पेशाचें हुबेहुब चित्र निघालें असतें. कादंबरीच्या पुढ्यांतील ह्यांचें हें एकच पुस्तक असल्यामुळें व तेही फारच संकुचित व पिटुकलें असल्यामुळें, त्यांची गणना रा० आपटे ह्यांच्यासारख्या पांच चार ग्रंथ प्रगटलेल्या कादंबरीकाराबरोबर करणें योग्य होणार नाहीं. रा० आपटे यांची स्फुर्ति कित्येक इंग्रजी कादंबरीकारांच्या ग्रंथावरून झालेली दिसते. आतां दुसऱ्याच्या ग्रंथावरून एखाद्याची ग्रंथरचना सुचलेली असलेली म्हणजे त्याचा संबंध ग्रंथ कुचकामाचा ठरतो असा कांहीं प्रकार नाहीं. मुळ ग्रंथांतील कल्पना सुधारून व त्यांचीं व्यंगें काढून टाकून ग्रंथरचना होण्यासारखी असते. शेक्सपियर किंवा डूमास ह्यांच्यासारख्या श्रेष्ठ ग्रंथकारांना ह्या उसन्याची फारशी फिकीर नसते. परन्तु एकंदरींत सामान्य ग्रंथकारासम्बन्धानें हा प्रकार गौणच समजावयाचा. मनुष्याच्या संसारांत व सुधारणेंत इतक्या कांहीं अजब गोष्टी भरलेल्या आहेत कीं, लाखों कादंबऱ्यांना लाखों निरनिराळे विषय तींत सांपडण्यासारखे आहेत असें असतां म्हणजे कारण नसतां, दुसऱ्याच्या तोंडाकडे आमच्या इकडील कादंबरीकारांनीं कां बघावें तें समजत नाहीं. शिवाय रा० आपटे ह्यांच्या अद्भुत व वास्तविक ह्या संबंधीच्या कल्पना किंचित अस्पष्ट आहेत असें वाटतें. त्यामुळें त्यांची कृति जितकी ठळक निपजावी तितकी निपजत नाहीं.

२८. आपण ज्याला अद्भुत व वास्तविक म्हणून मराठींत म्हणतों, त्यालाच युरोपांत Romantic व Realistic ह्या नांवानें ओळखतात. समाज व संसार ह्यांच्यांत अद्भुत व वास्तविक ह्यांचें नानाप्रमाणांचें मिश्रण असतें. शुद्ध अद्भुत किंवा शुद्ध वास्तविक असें ह्या जगांत कांहींच नाहीं. सर्व मिश्र असाच प्रकार आहे; आणि असा जर प्रकार आहे, तर निव्वळ शुद्ध वास्तविक कादंबरी लिहूं जाण्याचा आव घालणें केवळ थोतांड आहे; व थोतांड नसलें, तर चूक आहे. चित्रकर्माप्रमाणें कादंबरी लेखन ही कला आहे आणि चित्रांत हुबेहुब वस्तु उठवून देणें हें जसें अशक्य असतें, पांढरें व काळें ह्यांचें मिश्रण करून नेत्रांना हुबेहूब वस्तू दिसली असा भ्रम पाडावयाचा असतो, तीच तऱ्हा काद-

बरीचीहि असते. संसारांतील किंवा समाजांतील जीं हरतऱ्हेचीं कृत्यें त्यांपैकीं अनेकांचा लोप करून कांहीं तेवढीं प्रामुख्यानें. तीं मुळांत असतील त्यापेक्षां जास्त ठळठळीत अशीं दाखवावयाचीं, हेंच कादंबरी रचनेचें मुख्य रहस्य आहे. अनेक कृत्यांचा व गुणांचा लोप व अध्याहार आणि कांहींचें प्रदर्शन, हा सर्वच कादंबरीकारांचा मार्ग असतो. गुणांचें व कृत्यांचें वर्णन करण्याचा ठळठळीतपणाचा, अतिशयाचा किंवा अतिशयोक्तीचा अवलंब कोणत्या प्रमाणानें करावा, ह्यासंबंधीं मात्र आद्भुतिकांत व वास्तविकांत फरक असतो. एक अतिशयोक्तीचा जास्त उपयोग करतो व दुसरा कमी करतो. उदाहरणार्थः— पॉल आणि व्हर्जिनिया ही अत्यंत उत्कृष्ट अशी अद्भुत कादंबरी आहे. हिच्याशीं तुलना करावयाला एखादी वास्तविक कादंबरी घेऊं. अत्यंत वास्तविक अशा कादंबऱ्या म्हटल्या म्हणजे गुप्त पोलिसांच्या कथा होत. परंतु ह्यांतहि अद्भुताचा बराच भाग असतो. दुर्गुणांच्या मूर्ती, पाजीपणाचे कळस व फसवेगिरीचे पुतळे जर कोठें पहावयाचे असतील तर ते खऱ्याखुऱ्या समाजांत सांपडावयाचे नाहींत; ते पहावयास गाबेरियोचे ग्रंथच पाहिले पाहिजेत. ह्या कथा सोडून झोलाच्या ग्रंथाकडे वळूं. झोलाची नांना घ्या तींतहि अद्भुताचा भाग सडकुन आहे. ह्यूगोची The miserables हींत बोलून चालून अद्भुताचा अवलंब बराच केलेला आहे. डिकन्सच्या कादंबऱ्या वास्तविक म्हणून फारच नांवाजल्या गेल्या आहेत. त्यांतली पिक्विकची कादंबरी अत्यंत वास्तविक म्हणून कीर्ति आहे. परंतु तींतहि अतिशयोक्ति पहावी तर हवी तितकी आहे. येणेंप्रमाणें वास्तविक म्हणून नांवाजलेली वाटेल ती प्रख्यात कादंबरी घ्या. तींत अद्भुताचा अंश बराच सांपडेल. पृथ्वींत एका मात्र स्थलीं अद्भुताचें प्रदर्शन अत्यंत थोडें सांपडेल. व तें स्थल कोर्टांतील खटल्यांचे वर्तमानपत्रांतील रिपोर्ट हे होय. परंतु वर्तमानपत्रांतील रिपोर्टांकडे जाण्यापूर्वी खुद्द रा. रा. आपटे यांच्या वास्तविक कादंबऱ्यांनाच आपण आश्रय करूं. त्यांतहि अतिशयोक्ति व अद्भुत हें आहेच. संदर कादंबरीकाराचें राधाबाई हें वास्तविक पात्र घ्या. ह्यातान्या नवऱ्याशीं पातिव्रत्यानें राहणारी, नवरा मेल्यानंतर केस न काढणारी, व इतकी सुधारून व केस ठेवून पुनर्विवाह न करणारी, अशी बाई वास्तविक कोटींतील कीं अद्भुत ह्याचा निर्णय वस्तुवाद्यांनींच

करावा, सारांश काय, कीं अद्भूत अशी एकहि कोटी ज्यांत नाहीं असा कादंबरी ग्रंथ मिळणें प्रायः अशक्य आहे. आणि यदाकदाचित् मिळालाच तर तो भिकारांतला भिकार आहे असें खुशाल धरून चालावें पृथ्वीला सोडून जसें मनुष्यत्व नाहीं. तसें अद्भूताला सोडून कादंबरीत्वहि नाहीं.

२९. झोला, टॉलस्टॉय वगैरे प्रख्यात कादंबरीकारांना realistic किंवा वास्तविक हें जें विशेषण लावतात, तें त्यांच्यांत अद्भुत कल्पना नसतात म्हणून लावतात असा भाग नव्हे. तर साक्षात् संसाराच्या व समाजाच्या सुखदुःखांचीं वर्णनें ते अद्भुत शद्बांनीं करतात म्हणून त्यांना वास्तविक हीं संज्ञा लाविली जाते. खाणींत काम करावयाला जातांना व येतांना हजारों तरुण स्त्रीपुरुषांचे वाकडें पाऊल गेलें म्हणजे गेलें म्हणुन तारस्वरानें व कळकळीनें सांगण्यांत जे कादंबरीकार अतिशयोक्ति झाली म्हणुन शरमत नाहींत, त्यांनाच वास्तविक हें नामाभिधान यथार्थ लागूं पडतें. अन्यायानें किंवा न्यायानें काळ्या पाण्यावर गेलेला कैदी परत येऊन साधुवृत्तीनें व उदार चरितानें राहूं लागला असतां त्याचा छळ करणारा समाज राक्षसी होय, हें निक्षुन सांगणाऱ्या ह्यूगोसारख्या माहात्म्यालाच वास्तविक कादंबरीकाराची पदवी शोभते. त्याच्या सारख्याच्या पुढें इतर निव्वळ पांढऱ्यावर काळें करणारे खर्डेघाशे होत! फार झालें तर त्यांनीं सटरफटर गोष्टी लिहून व्यक्तिमात्राला रंजवावें इतकेंच.

३०. येथपर्यंतच्या निरूपणावरून एवढें स्पष्ट झालें कीं, realistic किंवा वास्तविक ह्या शब्दाचा अर्थ येथील लोक समजतात त्याहून यूरोपांतील कादंबरीकार फारच निराळा समजतात. एखाद्या विशिष्ट व्यक्तीचा किंवा विचाराचा अतिशयानें निष्कर्ष करणें हें तर ते आपल्या कलेचें बीज समजतात. रा० रा. आपटेहि कृतीनें युरोपियनांचाच बऱ्याच अंशानें कित्ता गिरवितात, परंतु कोणत्याही पद्धतीनें आपण आपलें काम करतों. त्याचें त्यांना पृथक्करण करून लक्षण करतांना पंचाईत पडते Realistic ह्या शब्दाचा, जें जसें असतें तें तसें वठवावयाचें असा अर्थ रा० आपटे समजतात परंतु realistic शब्दाचा हा अर्थ कादंबरीच्या किंवा इतर कोणत्याही कलेंत शक्य नाहीं. वर्तमानपत्रांतील रिपोर्टांत मात्र तो शक्य आहे. रा० रा० आपटे ह्यांच्या कादंबऱ्या वर्तमानपत्रांतील रिपोर्ट नाहींत

अर्थात् त्यांच्या कृतींतील ह्या शब्दांचा अर्थ युरोपियन कादंबरीकाराप्रमाणेंच आहे हें उघड आहे. मनांतील अर्थ एक व कलेचा निर्बंध दुसराच, असा प्रकार झाल्यामुळें, ह्यांच्या कादंबरींतील कित्येक भाग लांबलचक व कंटाळवाणे होतात, आणि संविधानकाची जुळणी बांधेसुद जमत नाहीं. कलेच्या मर्मासंबंधानें गैरसमज झाल्यानें हा प्रकार होतो हें उघड आहे. Natural व realistic ह्या दोन शब्दांनींही ह्या ग्रंथकाराच्या मनांत बराच घोंटाळा होण्यासारखा आहे. तसेंच त्यांचा दुसराही एक गैरसमज झालेला असण्याचा संभव दिसतो. तो हा कीं समाजांतील नीतीनें, वर्तनानें, विचारानें, रहाणीनें व दारिद्यानें, गलिच्छ असा जो भाग त्याचें प्रदर्शन करणें सत्कादंबरीचें काम नव्हे; परंतु हा समज निसर्गाच्या विरुद्ध आहे उजेड आणि अंधार, ईश्वर आणि सैतान, चांगलें आणि वाईट, सुगुण आणि दुर्गुण ह्या जोड्या ब्रम्ह्यानें सृष्टीच्या प्रारंभापासूनच निर्माण केल्या आहेत; त्यापैकीं एकीचा निषेध कोमल मनाच्या कादंबरीकारांनीं केला म्हणजे ती नाहींशी होते असें थोडेच आहे. डोळे गच्च मिटून धरिलें म्हणून आस्वल अंगावर चालुन यावयाचें थोडेंच रहातें. तेव्हां समाजांतील हा जो पतित भाग आहे त्याच्या स्थितीचें प्रदर्शन करणें हें प्रत्येक कादंबरीकारानें आपलें आद्य कर्तव्य समजलें पाहिजे. श्रीमंतींत अंध झालेल्या राष्ट्रांतील कादंबरीकारानां हें कर्तव्य करणें लाजिरवाणें वाटल्यास, ते त्यांना खुशाल वाटो. परंतु हिंदुस्थानांतील व महाराष्ट्रांतील कादंबरीकारांना तसें वाटून परिणाम लागावयाचा नाहीं. ह्या देशांतील दारिद्यानें गांजलेल्या, रोगानें पीडीलेल्या व विद्येनें मागासलेल्या, सामान्य जनसमूहाचा कैवार सहृदयतेचे मुर्तिमंत पुतळे जे कादंबरीकार त्यानीं घेतला नाहीं, तर दुसरा कोण घेइल? लोकांची खरी स्थिती लोकांच्या मनांत यथास्थित बिंबविण्याला कादंबरी सारखें दुसरें साधन नाहीं. त्या साधनाचा योग्य व पूर्ण उपयोग करणें हो महाराष्ट्रांतील कादंबरीकारांवर मोठी जबाबदारी येऊन पडलेली आहे. दोनशें वर्षापूर्वीच्या ग्रंथकारांनीं अद्भूत कादंबरीच्या द्वारानें वभासादिक कवितेच्या मार्गानें सामान्य जनसमूहाला आत्मबोध करून दिला. प्रस्तुत कालीं तेंच कार्य बहुधा वास्तविक कादंबऱ्याच्या व कदाचित अद्भुत गोष्टीच्या द्वारां व्हावें असा अदमास दिसतो. रा. रा.

आपटे यांची रामजी ही गोष्ट ह्या अदमासाचें प्रत्यक्ष उदाहरण आहे.

३१ एकंदर जगांतील कादंबऱ्याच्या मानानें रा॰ रा॰ हरि नारायण आपटे ह्यांच्या कादंबऱ्यांची योग्यता काय आहे हें दाखवुन दिलें म्हणजे मराठींतील वर्तमानकलीन वास्तविक कादंबऱ्याची किंमत कोणत्या दर्जाची आहे, तें सांगितल्यासारखेंच होतें. कारण, स्वतंत्र ग्रंथरचना करणारा असा कादंबरीकार महाराष्ट्रांत रा॰ आपट्याखेरीज दुसरा सध्यां कोणीच नाहीं. मासिक मनोरंजनाचे संपादक श्रीयुत काशीनाथ रघुनाथ मित्र, कादंबरी कल्पद्रुमाचे संपादक रा॰ चितळे व इतर किरकोळ लेखक ह्यांना मराठीं कादंबरी संपादकाच्या गणनेंत घेणें जरूर आहे. ह्यांची भाषा बरी असते. परंतु भाषांतर व रूपांतर ह्यांतच त्याचा बहुतेक व्याप असल्यामुळें, स्वतंत्र ग्रंथरचनेचा विचार होत असतांना त्यांच्या कडे लक्ष देणें न्याय्य होईल किंवा काय ह्याची शंका वाटते परभाषेंतील उत्तम कादंबऱ्याचीं भाषांतरें किंवा रूपांतरें करणें कोणत्याही प्रकारें वाईट आहे असा म्हणण्याचा रोख नाहीं. रोख एवढाच कीं भाषान्तर असो किंवा रूपांतर असो त्या ग्रंथांतील गुणाचें सर्व श्रेय मूळ ग्रंथकाराकडे जातें. भाषांतरकार किंवा रूपांतरकार गचाळ असल्यास ती दोषाला मात्र धनी होतो ही अशी अडचण असल्यामुळें ह्या दोघां संपादकांच्या व इतर तद्वर्गीयांच्या कृतींवर मी टीका करूं इच्छित नाहीं. तत्रापि श्रीयुत मित्र ह्यांच्या मासिकांतील कांहीं छोट्या गोष्टी कदाचित् स्वतंत्र असल्यास त्यांचा विचार येथें करणें अवश्य होतें. परन्तु भाषान्तर व रूपान्तर ह्यांच्या व्याप्तीनें स्वतंत्राचा त्यांच्या मासिकांत इतका लोप झाला आहे कीं स्वतंत्र कथा हुडकून काढणें म्हणजे एकप्रकारेंच कोंडेंच उलगडीत बसण्यासारखें आहे. रा. आपटे ह्यांच्या करमणुकींतील बहुतेक लहान गोष्टींना हाच कायदा लागू केला पाहिजे. रा. आपट्यांच्या मोठ्या कादंबऱ्यापैकीं ज्या कादंबऱ्या पाश्चात्य कादंबऱ्यांवरून सुचल्या त्यांची देखील किंमत तेवढ्यानें कमीच होते. कां कीं इतर देशांतील ग्रंथकारांनीं मोठ्या परिश्रमानें जीं संविधानकें जुळविलेलीं व ज्या कल्पना काढलेल्या असण्याचा संभव आहे, तीं संविधानकें व त्या कल्पना घेऊन रचना करणारा ग्रंथकार तज्ज्ञ व सहृदय टीकाकारांच्या आदरास जसा पात्र व्हावा तसा होत नाहीं. ही एक गोष्ट वगळली आणि रा. आपटे

ह्यांच्या कृतींचें परीक्षण करूं गेलें, तर असें दिसतें कीं अलीकडील तीस वर्षांतील वास्तविक कादंबरीकारांत हे फारच मोठ्या योग्यतेचे आहेत. ह्यांचें लक्ष राष्ट्रीय प्रश्नांपेक्षां सामाजिक प्रश्नांकडे विशेष आहे. सामाजिक प्रश्नांच्या वरवर दिसणाऱ्या ज्या बाजू त्यांचीं वर्णनें हे पारहाळानें देतात. परंतु ह्यांच्या पात्रांच्या हृदयांत विकारांचा व विचारांचा जो थोर कलह माजलेला असावा असें वाचकांस वाटतें त्यांचें प्रदर्शन करण्याकडे ह्यांचें लक्ष गेलेलें नाहीं. सामान्य संकटें, रोजचें वर्तन, घरगुतीं भाषणें, लहानसे पुरुषार्थ, ह्या विषयांचीं चटकदार वर्णनें ह्यांच्या ग्रंथांत हवीं तितकीं आहेत व ह्यांनीं जर आपली कोणतीच कादंबरी संपविली नाहीं तर हीं वर्णनें बराच कटाळा येई तोंपर्यंत वाढवितां येणें शक्य आहे. कुंचल्याचे दोन चार हात मारून एखादा वस्ताद जें चित्र कायमचें खुलवून टाकतो त्या चित्राचा नुसता उठाव करण्यास प्रस्तुत कादंबरीकाराला वर्णनांवर वर्णनें द्यावीं लागतात. सारांश मागें सांगितल्या प्रमाणें Society novels च्या वरती, डिकन्स, थॅकरे ह्यांच्या खालती, अशी ह्यांची सध्यां स्थिती आहे. तरी कादंबरी क्षेत्रांत प्रवेश करून ह्यांना कोठें दहा पंधरा वर्षे झालेलीं आहेत. पुढील दहा वीस वर्षांत हे कदाचित सध्यांच्या वाचकांच्या स्वप्नींही नाहींत असे स्वतंत्र चमत्कार करूं शकतील असें त्यांच्या रामजी ह्या गोष्टीवरून वाटते.

३२. प्रस्तुत कालीं मराठी कादंबरींच्या वास्तविक शाखेची स्थिति ही अशी आहे. इंग्लंडांतील society novels पेक्षां उत्तम अशा कादंबऱ्या तींत निपजूं लागल्या आहेत. परंतु स्कॉट, फील्डिंग, डिकन्स वगैरेंच्या बरोबरीचें अद्याप कांहीं एक झालेलें नाहीं. झोला, टॉलस्टाय ह्यांच्याशीं टक्कर मारण्याची तर गोष्ट अजून बरीच लांब आहे. वास्तविक शाखेच्या ह्या स्थितीपेक्षांही अद्भुत शाखेची दैना अधिक आहे. मुक्तामाला, मुंजूघोषा, वगैरेचें जें एकदां खुरटें पीक येऊन गेलें त्यावर अद्याप पर्यंत पुनः म्हणून अद्भुत शाखेला बहार आला नाहीं. परंतु ही सर्वथा शोचनीय गोष्ट आहे. पर्वा नुकती जर्मनींत जीन पॉल रिक्टर सारखी मंडळी नामी नामी अद्भुत कथा निर्माण करते; आणि अद्भुताचा काळ गेला आणि वास्तविकाचा काळ आला, म्हणुन म्हातारपणच्या गोष्टी करण्यांत आह्मी शहाणपणा मानतों, ह्याला काय बरें

म्हणावें ? आपल्याइकडील सरस्वतीच्या राज्यांतील बहुतेक एकोन एक क्षेत्रें लागवडी वाचून आज शेंकडों वर्षे रिकामी पडलेली असतां, अमुक क्षेत्र नापीक व अमुक क्षेत्र सुपीक, असें आम्ही काय म्हणून म्हणतों ? परदेशचे लोक आपापल्या देशानां लागु पडणारी जीं विधानें करतात, तीं अक्षरशः उचलुन आम्हीं चोहोंकडे मिरवावीं हा शहाणपणा कोठला ! गोष्ट अशी आहे कीं आपल्याइकडील सरस्वतीप्रदेशांतील सर्व क्षेत्रें भर-पुर पीक देण्याला खचून मेहनत करणाऱ्या व पाश्चात्य यंत्राचा उपयोग करणाऱ्या उद्योगी कृषीवलाची उत्सुकतेनें नुसती वाट बघत आहेत. ही फारा दिवसाची आशा सफल झाली तर ही क्षेत्रें जें उफाड पीक देतील तें घेऊन महाराष्ट्रांतील लोक आपल्याला धन्य मानतील व पाहून पृथ्वीवरील सर्व राष्ट्रें कौतुकानें माना तुकावतील ? परंतु हें व्हावें कसे हाच प्रश्न आहे.

३३. बाळमित्राचें भाषांतर करणाऱ्या छत्र्यांपासून तों मोठमोठ्या वास्तविक कादंबऱ्या लिहिणाऱ्या आपट्यांपर्यंत वास्तविक कादंबरीची मजल कोठपर्यंत येऊन पोहोंचली, व ही लहानशी मजल मारण्यास किती वर्षे लागलीं, ह्याचा विचार केला म्हणजे टॉलस्टॉयपर्यंत जाण्याला किती युगें लागतील तें हरि जाणें! समाधानाची बाब एवढीच कीं पाऊल पुढें आहे, मागें नाहीं. आतां ह्युगो, झोला, टॉलस्टॉय ह्यांच्यासारखी ग्रंथरचना व्हावी अशी इच्छा असेल, तर त्याला एकच उपाय आहे. ह्यांच्यासारखीं मनें ह्या देशांतील कादंबरीकारांचीं बनलीं पाहिजेत. विधवांचीं दुःखें पाहून जीव तिळतिळ तुटला पाहिजे. गरीबांची उपास-मार पाहून स्वतःच्या घशाखालीं घास उतरतां कामा नये. स्वदेशाचें दैन्य पाहून रात्रींची झोंप डोळ्यांवरून उडून जावी. स्त्रियांची बेअब्रू झालेली पाहून द्रौपदीच्या भीमाप्रमाणें त्वेष यावा. ही मनोवृत्ति ज्यांची झाली, ह्या ब्रह्मानंदी ज्यांची टाळी लागली. त्यांनींच कप्तान ड्रेफुची बाजू घेऊन सर्व राष्ट्रांविरुद्ध भांडावें व रशियांतील पादशाहांनाही चळ-चळ कापावयाला लावावें. इतरांची माय हीं कामें करणाऱ्या कादंबरी-कारांना व्याली नाहीं ! तेव्हां उत्तमोत्तम कादंबरीकार व्हावयाचें म्हणजे मनोवृत्ति अशी अत्यंत जाज्वल्य पाहिजे. श्रेष्ठ विद्या, विस्तृत वाचन, मोठा प्रवास, तीक्ष्ण निरीक्षण, कडक परीक्षण, थोर औदार्य, गाढ सहा-

नुभुती व नाटकी लेखणी हे गुण तर नांव घेण्यासारख्या प्रत्येक कादं-बरीकारांत हवेतच. परंतु सर्वांत मुख्य गुण म्हटला म्हणजे जाज्वल्य मनोवृत्ति हवी. तिच्या अभावीं वरील सर्व गुण व्यर्थ होत. ही मनोवृति कृत्रिम तऱ्हेनें येणें नाहीं ही ईश्वराची देणगी आहे. उत्तेजक मंडळ्या-च्या बक्षिसांनीं किंवा प्रोत्साहक सोसायट्यांच्या देणग्यांनीं रद्दड कविता रद्दड कादंबऱ्या, रद्दड नाटकें, रद्दड चरित्रें, अशी सर्व रद्दड ग्रंथप्रजा उत्पन्न होईल. तेजस्वी ग्रंथसंपति निर्माण व्हावयाला जाज्वल्य आशा प्रखर मनो-वृत्तीचा जातीचाच अंकुर पाहिजे. बक्षिसांनीं प्रासादीक ग्रंथ निर्माण होते तर, बाळाजी बाजीरावानें म्हटल्याप्रमाणें, चुटक्यांनीं पोरेंही झाली असती ! रा. आपटे ह्यांची वाङ्मयप्रजा उत्तेजनोत्पन्न नाहीं हा एक त्यांच्या तर्फेचा गुणच आहे.

३४. रा रा. आपटे ह्यांच्या बहुतेक सर्व कादंबऱ्या व्यक्तिविषयक असून, त्यांतील बरींच पात्रें सुधारक वर्गापैकीं आहेत. रा. आपटे स्वतः ह्याच वर्गापैकीं असल्यामुळें, त्यांच्या मनोरचनेची सावली त्यांच्या पा-त्रांवर पडावी ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. अखिल विश्वाच्या सुखादुःखाशीं समानशील असणारे व्यास, वाल्मिकी, होमर, गेटी, रामदास, रानडे, व्होल्टेअर, डांटी, ह्यांची गोष्ट निराळी, आणि दोन दिवसाच्या पक्षा-भिमानांत गुंतणारी तुमच्या आमच्यासारखी सामान्य माणसें निराळीं ! तेव्हां सुधारणेची छटा त्यांच्या लेखांत सर्वत्र दिसावी हें स्वाभाविकच आहे. रा॰ रा॰ आपटे यांनीं आजपर्यंत पांच सहा मोठमोठ्या कादं-बऱ्या करमणुकींतून प्रसिद्ध केल्या त्यापैकीं प्रत्येक दहा दहा हजार वाचकांनीं वाचली असें धरलें, तर सुधारणेच्या मतांचा स्पर्श बऱ्याच प्रदेशाभर झाला असें कबूल केलें पाहिजे. सुधारणेचा जो हा प्रकाश पडला तो असाच पडत जावा असें माझें मत आहे. परंतु ह्या जंगम प्रेरणेला तोलून धरणारा जो उद्धारकपक्ष त्यांची स्थावर मतें कायम कर-ण्याला कादंबरीद्वारा कांहीं प्रयत्न झालें आहेत असें दिसत नाहीं. अपवा-दाला, प्रो. गोळे ह्यांचा ' हिंदुधर्म आणि सुधारणा ' हा एकच उत्कृष्ट ग्रंथ आहे. असो. मूळ स्थावरच जर जाग्यावर नसले. तर जंगमतेचा प्रयोग कशावर करावयाचा ? तेव्हां रा॰ आपटे यांच्या प्रगतिशील प्रयत्नानें तोलून धरण्यास स्थितीशील प्रयत्नाची जरूर आहे अशी इशा-

रत करून आणि ह्या वास्तविक कादंबऱ्यांचा पुढील दहा वीस वर्षांत स्वतंत्र उत्कर्ष व्हावा असें इच्छुन ह्या प्रकारणाला येथेंच तूर्त सोडून देतो

३५. युरोपांतील कादंबरीकारांशीं तुलना केली असतां आपल्या इकडील वर्तमान कादंबरीकारांची योग्यता कोणत्या प्रकारची आहे ह्याचा विचार झाला. ह्या विचारावर कोणी असा आक्षेप आणतील कीं, थोरांशीं लहानाची तुलना करून लहानाला लहान ठरविणें व त्यांचा उत्साह भंग करणें सहानुभुतीचें लक्षण नव्हे. परंतु प्रस्तुत टीकाकर्त्याचें सहानु- भूती प्रमाणें सत्याकडे व प्रोत्साहानाप्रमाणेंच प्रगतीकडे विशेष लक्ष असल्यामुळें त्याला हा तुलनेचाच मार्ग स्वीकारणें श्रेयस्कर दिसतें. राष्ट्रा- राष्ट्रांत जो जीवनार्थकलह चालला आहे, त्या कलहांत उत्साहानें शिरण्याची जर इच्छा व अवश्यकता असेल तर त्या कलहार्थ लागणारी साधनेंही आपल्यापाशीं इतरांपेक्षां श्रेष्ठ निदान इतरांच्या बरोबरीचीं तरी असणें अवश्यक आहे. कलहांत शिरल्यावर लहानपणाच्या सबबीकडे लक्ष देऊन कोणी कींव करतो, अशांतली गोष्ट बिलकूल नाहीं. तेव्हां आपल्या इकडील कादंबरीच्या पुस्तकाची किंमत ठरवितांना जगांत जें कांहीं उत्कृष्ट असें सवर्गीय सारस्वत असेल त्याशीं तुलना करणें भाग आहे. शिवाय अशी तुलना करण्याला दुसरेंही एक कारण आहे. मराठी कादंबरीकार ग्रंथ लिहितात ते महाराष्ट्रांतील सर्व लोकांकरितां लिहितात असा माझा समज आहे. तसेंच महाराष्ट्रांतील अत्युच्च शिक्षण मिळा- लेला जो वर्ग त्या वर्गाच्या पसंतीस जो ग्रंथ उतरेल तोच श्रेष्ठ होय, असा माझा दुसरा समज आहे. महाराष्ट्रांत प्रस्तुतकालीं अत्युच्च शिक्षण मिळालेला जो वर्ग आहे त्या वर्गाला यूरोपांतील सारस्वत माहीत झालेलें आहे. उत्कृष्ट कोणते व अपकृष्ट कोणतें हें तो वर्ग उत्तमोत्तम जाणतो. तेव्हां एखाद्यानें आपला ग्रंथ त्याच्यापुढें मांडला तर त्याची किंमत ते लोक कोणत्या कसोटीनें व किती कसोशीनें करतील हें स्पष्ट आहे. प्रस्तुतकालीं सहृदय असे शिकलेलें लोक पहावें तर ते उच्चप्रतीच्या युरोपियन कादंबऱ्याच वाचण्यांत गुंग झालेले दिसतात. ह्या लोकांना मराठी कादंबऱ्या वाचण्याला जो लावील व त्या वाचल्या नाहींत तर उत्कृष्ट विचारांना आपण मुकूं असें जो त्यांना भासवील तोच उत्कृष्ट कादंबरीकाराच्या पदवीला पात्र होईल.

३६. महाराष्ट्रांतील अद्भूत व वास्तविक-कादंबऱ्यांची परंपरा काय, अद्भुत कादंबरीचें स्वरूप काय, व वास्तविक कादंबरीचें मर्म कोणतें इत्यादि प्रकरणांचा ऊहापोह थोडक्यांत होण्यासारखा होता तेवढा केला. त्यावरून इतकें दिसून आलें कीं, समाजांतील व व्यक्तींतील गुणांचे व विचारांचें प्रदर्शन करण्यास हीं दोन साधनें उत्तम आहेत; इतकेंच नव्हे तर समाजांत उत्कृष्ट विचारांचा व पुरुषार्थाच्या कल्पनांचा प्रसार करण्यास कादंबरीसारखें दुसरें सोपें साधनच नाहीं. ह्या उत्कृष्ट विचारांचा व पुरुषार्थाच्या कल्पनांचा प्रादुर्भाव ज्या व्यक्तींच्याठायीं झाला असें कादंबरीकारांना दाखवावयाचें असतें, त्या व्यक्ती व्यवहारांतील वर्तमान समाजांत प्रायः असणें अशक्यच असतें. त्या कादंबरीकाराच्या अद्भुत सृष्टींतच वास करीत असतात. परंतु वास्तविक कादंबरीकारानें त्या एकदा आपल्या वास्तविक कथानकांत आणून सोडिल्या म्हणजे त्या वाचकांचीं मनें आपल्याकडे आकर्षून घेतात व संतांप्रमाणें वाचकांना तात्काळ आपल्यासारखें करून टाकतात. मतप्रसाराचें काम कादंबऱ्या करतात त्या हें असें करतात. कथानकांतील पात्रांशीं तादात्म्य पावण्याचा मनुष्यमात्राचा स्वभावच आहे. कादंबऱ्या वाचतानां त्यांतील पत्रांचीं सुखें, दुःखें, संकटें, विजय, आणि शेवटीं मतें आपलींच आहेत अशी भावना वाचकांच्या मनांत उद्भवेल आणि ही भावना उद्भ ली म्हणजे कादंबरी कारांचें कार्य सफल होतें. ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिण्याचा तरी हाच हेतु असतो. आतां कादंबरींचे ऐतिहासिक म्हणून एक निराळेच सदर काढीत असतात परंतु तसें करण्याचें कांहीं कारण नाहीं. ऐतिहासिक हा जर कादंबऱ्याचा एक निराळाच भाग समजला, तर नैतिक, शास्त्रीय, प्रासासिक, प्रेमळ, राजकीय वगैरे नाना प्रकारचे असंख्य वर्ग करणें जरूर पडेल. तें अनवस्थित अतएव अशास्त्र होय.

३७. समाजांत कादंबऱ्याचें कार्य काय असतें हें वरील कलमांवरून ध्यानांत येण्यासारखें आहे. अर्थात, लोक कादंबऱ्या फार वाचतात, म्हणुन नाकें मुरडणाऱ्या व हाकटी करणाऱ्या कित्येक लोकांना आपला प्रतिस्पर्धी किती जुनाट व केवढा बलाढ्य आहे ह्याचा यथास्थित अंदाज झालेला नसतो असेंच म्हणावें लागतें. हा जर अंदाज त्यांना होईल तर ह्या राक्षसांचा अधिक्षेप करण्यापेक्षां आत्मकार्यार्थ ह्याचें सहाय्य घेणें

जास्त हिताचें आहे हें त्यांच्या ध्यानांत येईल. समाजांत अमुक एका मताचा प्रसार व्हावा अशी इच्छा उत्पन्न झाली म्हणजे सरस्वतीच्या ह्या मांडलिकाला ही इच्छा अमलांत आणण्याची विनंति केली असतां ती तो खुशीनें मान्य करील. आपली उपयुक्तता दाखवून मान्यता वाढवून घेण्याची असली अलभ्य पर्वणी कोण शहाणा व्यर्थ दवडील ! समाजाची इच्छा काय आहे, त्याचें स्वरूप समजून घेऊन तो आपल्या कामाला जारीनें लागेल. लहान मुलांना पशुपक्षांच्या गोष्टी सांगून त्यांच्या मनांत युक्ति व साहस ह्यांचें बीजारोपण करील, स्त्रीजनांना संसारसुखाची गुरु-किल्ली पढवील; तरुणांना राष्ट्रीय महत्वाकांक्षेचें रहस्य कळवील; आणि वृद्धांना आयुष्याच्या इतिकर्तव्यतेचें दिग्दर्शन करील; आणि इतकेंहि करून तें कसें व केव्हां केलें हें कोणाला समजून देणार नाहीं. अशी ह्या मयासुराची करणी आहे. युधिष्ठिराप्रमाणें ती ज्या लोकांना लाभली ते लोक धन्य होत !

---

समाप्त

आ
नं
द
प्रे
स
सा
ता
रा

गायत्री उपासनेवर लिहिलेला शास्त्रोक्त ग्रंथ

१ **प्रणवोपासना.**

लेखकः— डॉ. श्री. म. वैद्य. एल्. एम्. एस्. इसलांपूर.

प्रस्तावना लेखकः— प्रो. रा. द. रानडे. एम्. ए. पुणे

किंमत २ रुपये.

---

सरकारनें प्राथमिक शाळा व ट्रेनिंग कॉलेज या करितां मंजूर केलेलीं पुस्तकें.

रा. रा. शं. ल. वैद्य यांची पुस्तकें

**२ वनस्पतींचीं कुलें. किं. १२ आणे.**

**३ शाळेच्या बागेसंबंधीं माहिती भाग १ किं. ८८**

**४ ,, ,, ,, भाग २ किं. ८।०**

**५ सृष्टिनिरीक्षण या विषयावर १६ निबंध.**

**किं. १० आणे.**

---

**येथें विकत मिळतील.**